# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक १९ मे २००५**

**रजिष्टर क्र.**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९.०५.२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरुवार दिनांक १९.०५.२००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांच्ये अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला प्र.आयुक्त, तसेच संबंधित अधिकारी व खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री. बम्हणे पुनमचंद सोनाजी
२. स.स.श्री. सुरे सिताराम इसराम
३. स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४. स.स.श्री. गवळी रविकांत काशिनाथ
५. स.स.श्री. नाहदी नासेर महमंद याहीया
६. स.स.श्री. पांडे विनायक प्रभाकर
७. स.स.श्री. दाभाडे मिलींद यशवंत
८. स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
९. स.स.श्री. ठाकुर पुरुषोत्तम रघुविरसिंग
१०. स.स.श्री. खान सलीम खान यासीन
११. स.स.सौ. पाटील अलका रमेश
१२. स.स.श्री. जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री. गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ. जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री. महेश शिवाजीराव माळवतकर
१८. स.स.श्री. अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री. जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.श्री. सोनवणे कचरु श्रीपत
२१. स.स.सौ. इंगळे शकुंतला सांडुजी
२२. स.स.सौ. रगडे सुशिला भगवान
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ. पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२६. स.स.सौ. खान अजरा जबीन मसुद
२७. स.स.सौ. खान मेहेरुन्नीसा खान हमीद
२८. स.स.श्री. मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ. मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ. यास्मिन बेगम अ.कदीर
३१. स.स.श्री. खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज

३३. स.स.श्री. स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री. अ.रशिद खान मामू
३५. स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
३६. स.स.श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३७. स.स.श्री. रिडलॉन संजु सुग्रीव
३८. स.स.श्री. खान कैसर बद्रोद्दीन
३९. स.स.सौ. सिध्द वीणा गजेंद्र
४०. स.स.श्री. खान निसार मोहमंद खान
४१. स.स.श्री. शेख मुनाफ शेख यासीन
४२. स.स.श्री. हाजी शेरखान अ.रहेमान
४३. स.स.सौ. खान आबेदा बेगम गुलाब खान
४४. स.स.सौ. राऊत छाया विलास
४५. स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४६. स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री. गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.श्री. अमोदी अबुबकर बिनसईद
४९. स.स.सौ. शेख शमशाद बेगम शेख हफीज
५०. स.स.श्री. जेजूरकर संतोष सुधाकरराव
५१. स.स.श्री. पटेल सलीम शमशेर पटेल
५२. स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव
५३. स.स.सौ. पोळ सरला सखाराम
५४. स.स.श्री. कटकटे सतीष विश्वनाथ
५५. स.स.सौ. बोरामणीकर कला सुरेश
५६. स.स.सौ. गायकवाड मंगल प्रकाश
५७. स.स.श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत
५८. स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
५९. स.स.सौ. महाजन मनिषा अमर
६०. स.स.श्री. गांगे रविंद्र लक्ष्मण
६१. स.स.सौ. पाटणी हर्षमाला विजयकुमार
६२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६३. स.स.श्री. खुडे विजय किसन
६४. स.स.श्री. खेंडके संतोष सर्जेराव
६५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६६. स.स.श्री. शिंदे दामोधर माधवराव
६७. स.स.श्री. गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६८. स.स.सौ. ससाणे सरिता अशोक
६९. स.स.श्री. घडमोडे भगवान देविदासराव
७०. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
७१. स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
७२. स.स.श्री. डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७३. स.स.श्री. कुचे नारायण तिलोकचंद
७४. स.स.सौ. शिंदे पुष्पा बाळु

७५. स.स.सौ. वाघमारे पार्वताबाई विजय
७६. स.स.सौ. संगिता विठ्ठलराव जाधव
७७. स.स.श्री. विसपुते शंशाक दामोधर
७८. स.स.श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७९. स.स.सौ. खंदारे वंदना प्रकाश
८०. स.स.सौ. कोंडेकर अंजली दिलीप
८१. स.स.श्री. जोशी संजय रामदास
८२. स.स.सौ. विजया किशोर राहटकर
८३. स.स.श्री. दाभाडे हिम्मतराव साळुबा
८४. स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८५. स.स.श्री. मोरे कचरु विश्वनाथ
८६. स.स.श्री. शिरसाट संजय पांडुरंग
८७. स.स.श्री. बारवाल गजानन रामकिसन
८८. स.स.श्री. मोमीन सफिया फिरदोस
८९. स.स.श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहेमद
९०. स.स.सौ. घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

१. स.स.श्री. केनेकर संजय किसनराव
२. स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
३. स.स.श्री. राजेश गुलाबचंद व्यास
४. स.स.श्री. सुरजितसिंग सबरवाल
५. स.स.श्री. कुलकर्णी सुरेंद्र

<u>चर्चा :</u>

**श्री.गजानन बारवाल :** माजी नगराध्यक्ष स्व.श्री.बजरंगलाल शर्मा यांचे नुकतेच दु:खद निधन झाले, त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**श्री.रशिद खॉन (मामू) :** माजी खासदार व दोन वेळा आमदार राहीलेले मा.काझी सलीम यांचेही दु:खद निधन झालेले आहे, त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

**सौ.अनिता घोडेले :** महंत नागराज बाबा यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री.संजय जोशी :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** श्रध्दांजलीसाठी सर्वांनी स्तब्ध उभे रहावे.

(याचवेळी माजी नगराध्यक्ष स्व.बजरंगलाल शर्मा तसेच माजी खासदार पै.काझी सलीम आणि महंत नागराज बाबा यांचे दु:खद निधनाबद्दल श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**श्री.संजय शिरसाट :** सर्व सदस्यांना विनंती की, सभागृह नेता या नात्याने सहकार्य करावे. या सभागृहात काही ज्येष्ठ व अनुभवी स.सदस्य पुन्हा निवडून आलेले आहे. त्यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. शहराच्या विकासासाठी या सभागृहात एकमताने चर्चा होणे आवश्यक आहे. विनंती की, सर्वांनी यासाठी सहकार्य करावे. सभेच्या सुरुवातीस चर्चा घ्यावी असे सर्वच स.सदस्यांचे एकमत आहे. मा.महापौरांना विनंती आहे की, सुरुवातीला चर्चा घ्यावी.

**मा.महापौर :** आजची सभा ही पहिली सभा होत आहे. चर्चा घ्यावी असे सर्वांचेच मत आहे. चर्चा घेण्यांत येते, चर्चेस सुरुवात करावी. चर्चा करीत असतांना एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे. आपल्या जागेवर उभे राहून एका एकाने चर्चा करावी.

**श्री.गजानन बारवाल :** विकासाच्या दृष्टीकोनातून हा प्रश्न आहे. आज रोजी शहरातील पाणी पुरवठा हा अपुरा होत आहे. विज भार नियमन होत आहे. सामोरे जावे लागेल. शहरातील पाणी पुरवठा कसा सुरळीत होईल यासाठी कार्यवाही करावी. विजेचे भार नियमन होत आहे. १० मिनिटे विज गेली तर १-१ तास पाणी पुरवठा उशीरा होत असून कमी प्रमाणात पाणी मिळत आहे. तसेच शहरातील शुन्य कचरा मोहीम राबविण्याचा आपण संकल्प हाती घेतला. आपण चांगले काम करीत आहात. अभिनंदन, ही मोहिम राबवित असतांना आपले अधिकारी, कर्मचारी कोठे तरी कमी पडतात. बऱ्याच ठिकाणी कचरा दिसून येतो. शुन्य कचरा मोहीम चांगली योजना आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे. सर्व स.सभासदांचे सहकार्य आपणांस राहील.

**सौ.लता दलाल :** या सभागृहात अशी माहिती हवी आहे की, या महानगरपालिकेत प्र.आयुक्त असतांना काही अधिकाऱ्यांना पदभार ज्यांची योग्यता नाही अशा व्यक्तींना प्रभारी चार्ज देण्यांत आलेले आहे. शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज एका शिक्षकास देण्यात आलेला आहे. दुसरे कुणी नव्हते का? शिक्षणाधिकारी पदाचा पदभार त्या शिक्षकांनी कधीही स्विकारलेला नाही.

**मा.महापौर :** मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** शिक्षणाधिकारी रजेवर गेल्यामुळे पदभार शिक्षण खात्यात नोकरी करणारे जे सर्वात जेष्ठ बी.एड. झालेले आहेत. त्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. इतर कोणास देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**श्री.संजय जोशी :** बाकीच्या काही अधिकाऱ्यांना पदभार दिलेला आहे. त्यांचाही खुलासा देण्यात यावा. एका अधिकाऱ्यांना पदभार देणार होते. मा.महापौर यांनी पत्र दिल्यामुळे थांबविण्यात आला. आस्थापना विभागाकडून कुणाचेही नांव प्रस्तावित केलेले नव्हते. नियमाप्रमाणे आस्थापना विभागाकडून नाव प्रपोज होऊन यावयास पाहिजे त्यानंतर पदभार देणे योग्य होऊ शकते. तसे झालेले नाही. मा.महापौर, उमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता यांना विश्वासात घेतले नाही. एकट्यानेच स्वत:च प्रशासन चालवायचे का?

**सौ.लता दलाल :** कुणी अनुभवी नसेल तर तेव्हा अति.कार्यभार देता येतो. यापूर्वी कोणी शिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्विकारला नव्हता का? म्हणून नाविलाजाने एका शिक्षकांना पदभार दिला गेला. उपआयुक्त पदावर राहीलेले किंवा सांस्कृतिक अधिकारी म्हणून यांनी सुध्दा यापुर्वी काम केलेले आहे. अवघड परिस्थिती त्यांनी सांभाळले. खुलासा करण्यात यावा.

**श्री.संजय जगताप :** मा.आयुक्तांनी ज्या ज्या नियुक्त्या केल्या त्या सर्व रद्द कराव्यात यात भ्रष्टाचार झाला असेल असे वाटते.

**मा.महापौर :** कुणावर आरोप करु नये नियमामध्ये राहून बोलावे.

**श्री.संजय जगताप :** मुख्य लेखापरिक्षक पदावर पदभार दिला त्यासाठी ७ वर्ष अनुभव आवश्यक असून औरंगाबादचा रहिवाशी नसावा. कशाच्या आधारे नियुक्ती केलेली आहे. सहाय्यक आयुक्त श्री.जाधव यांनी खुलासा करावा.

**श्री.संजय शिरसाट :** प्रशासनातर्फे उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.)** : शिक्षणाधिकारी श्री.बोरुडे हे १ महिन्याच्या रजेवर आहे. अति.पदभार देतांना कुणास द्यावयाचा हा निर्णय प्रशासनाचा आहे. आताच स.सदस्य श्री. जगताप यांनी पात्रतेचा मुद्दा उपस्थित केला. कायम पदासाठी पात्रतेचा विचार करण्यांत येतो. अति.पदभार द्यावयाचा निर्णय अनेकवेळा प्रशासनास घ्यावा लागतो. काही पदभार तांत्रिक अधिकाऱ्यांकडे दिले जातात. शिक्षक संघटनेने एक निवेदन दिलेले होते. जेष्ठ मुख्याध्यापकास चार्ज देण्यांत यावा.

**श्री.संजय जोशी :** एका निवेदनावर शिक्षकाकडे पदभार दिला बरोबर नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** निवेदनानुसार पदभार दिलेला नाही.

**सौ.लता दलाल :** चुकीचा खुलासा करण्यांत येऊ नये.

**श्री.संजय जोशी :** मा.महापौरांनी आदेश करावेत की, सर्व दिलेले पदभार रद्द करावे, अशी सभागृहाची मागणी आहे.

**श्री.दिलीप गायकवाड :** हा प्रशासकीय विषय आहे. शहराच्या विकासाच्या बाबतीत चर्चा करावी.

**श्री.संजय जोशी :** सेक्शन ५३ प्रमाणे सर्वसाधारण सभागृह हे सक्षम आहे. दिलेले पदभार रद्द करुन चर्चा थांबवावी. सर्वसाधारण सभेला नियुक्तीचे अधिकार आहेत.

**सौ.लता दलाल :** सभागृहाला विश्वासात घ्यावे. काही चर्चा न करता दिलेले पदभार रद्द करावे. मा.महापौरांनी आदेश द्यावे. सर्व सभागृहाची मागणी आहे.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** प्रशासनाने नियमाप्रमाणे केलेले आहे. नियमाप्रमाणे केलेले आहे ते लिगल आहे का इल्लिगल आहे. इल्लिगल केले असेल तर परत घ्यावे.

**श्री.संजय जोशी :** माजी मापौर श्री.अ.रशिद खॉन मामू हे सुध्दा मान्य करीत आहे. मा.महापौरांनी आदेश द्यावे, सर्व पदभार रद्द करावे.

**श्री.मिलींद दाभाडे :** पाणी पुरवठ्यात असलेले श्री.वसंत निकम, उपअभियंता यांचीही दीड वर्षातच बदली करण्यात आली. राजकीय दबावाखाली बदली केलेली आहे.

**श्री.संजय शिरसाट :** प्रशासनाने अति.चार्ज दिले यावर बऱ्याच स.सदस्यांनी चर्चा केली. अतिरिक्त कार्यभार बाबत सर्वांच्या भावना ऐकल्या. मा.आयुक्त जोशी साहेब होते, निवडणूक झाली, ते सुट्टीवर निघुन गेले. अति.कार्यभार आयुक्त म्हणून श्री.भगत साहेबांकडे दिला. नगरसेवकांनी अधिकाऱ्याच्या बद्दल माहिती घेतली. स्वभाव कसा आहे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. महानगरपालिकेत येत होते. काही ज्येष्ठ नगरसेवक या सभागृहात आहेत. त्यांना अगोदरच महानगरपालिकेची संपूर्ण माहिती आहे. त्यांना सर्व जाणीव आहे. महानगरपालिकेचा कारभार कसा चालतो.

**श्री.संजय जोशी :** मुळ विषयावर चर्चा करावी, सभागृह नेता यांनी बाकीची चर्चा करु नये, नेमके काय म्हणावयाचे ते सांगावे.

**श्री.संजय शिरसाट :** माझा बोलण्याचा हेतू चांगला होता. अतिरिक्त चार्ज बाबत माहिती देत होतो. श्री.लोखंडे यांचेकडे सहाय्यक आयुक्त-२ चा चार्ज आपल्याकडे आहे सांगतात. यास एक कोणी जबाबदार नाही. प्रशासनात एक चैन, साखळी आहे. मा.महापौर, उपमहापौर यांनी पत्र दिले, म्हणून तो पदभार देण्याचे थांबविले त्याबद्दल अभिनंदन. शिक्षणाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक या पदाच्या बाबतीत चर्चा झाली. या सभागृहास नियुक्तीचे अधिकार आहेत. असे अतिरिक्त चार्ज दिलेले रद्द करावे व सभागृहाच्या सम्मतीने अति.चार्ज देण्याचे आदेश काढावे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** किती अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या, केव्हा झालेल्या आहेत, याचा खुलासा करण्यांत यावा.

**मा.महापौर :** आपण सभागृहात उशिरा आलेले आहात. अतिरिक्त चार्ज बाबत चर्चा चालू आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अर्ध्या तासापासून चर्चा चालू आहे. स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी प्रश्न केला की, बदल्या कोणी व केंव्हा, कोणाच्या अधिकारात केल्या, परंतू हा काही विषय पत्रिकेवरील विषय नाही. चर्चेला वेळ दिलेला आहे. कोणत्या विषयावर चर्चा चालू आहे, याची माहिती त्यांनी अगोदर घ्यावयास पाहिजे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन आपण आपला निर्णय द्यावा.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** पुढील बैठकीत संपूर्ण माहिती देण्यात यावी. तोपर्यंत त्यांना काम करु द्यावे.

**श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन :** जे अतिरिक्त चार्ज दिलेले आहेत ते रद्द करावेत.

**मा.महापौर :** सभागृहाच्या भावना लक्षात घेता व सध्याचे आयुक्त हे प्रभारी आयुक्त आहेत आणि या महानगरपालिकेत नियमित आयुक्त लवकरच येणार आहे. या कालावधीत प्रभारी आयुक्त यांनी ज्या ज्या अधिकारी, कर्मचारी यांना अतिरिक्त पदभार दिले, सर्व अतिरिक्त पदभार काढून पूर्वी जे अधिकारी/ कर्मचारी काम पहात होते, त्यानाच तो पदभार देण्यांत यावा. शिक्षण अधिकारी रजेवर असल्याने त्यांचा पदभार त्यांचे विभागप्रमुख यांचेकडे देण्यांत यावा. याबाबतचे आदेश सभा संपल्यानंतर लगेच काढण्यात यावे.

**मा.आयुक्त :** सर्व स.सदस्यांनी सुचना केल्या, प्रश्न विचारले, मला सद्भावना आहे. माझे सर्वांशी संबंध चांगले आहे. कोणत्याही पक्षाने दबाव आणलेला नाही व आणणार नाही.

**श्री.संजय जोशी :** राजकारणाचा विषय आणू नये. कुणीही राजकारणाबद्दल चर्चा केलेली नाही.

**उपमहापौर :** या सभागृहाचे अध्यक्ष मा.महापौर आहेत. मा.आयुक्तांनी असे शब्द वापरु नये. सभागृहाचा मान राखावा. मा.महापौरांनी जे आदेश दिले, त्यांचा सन्मान राखावा.

**श्री.संजय जोशी :** मा.आयुक्तांनी जे शब्द वापरले ते मागे घ्यावे. राजकारणा संबंधी कोणी सदस्य बोलेले नाही.

**मा.महापौर :** मा.आयुक्तांना बोलण्यास वेळ देण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** सभागृहात सर्वात श्रेष्ठ मा.महापौर ते प्रथम नागरिक आहेत. मा.आयुक्त हे सभागृहाचे एक सदस्य आहेत, याची नोंद मा.आयुक्तांनी घ्यावी. स.सदस्यांनी राजकीय दबाव टाकलेला नाही. नियमबाह्य कार्यवाही झाली. सभागृहाला विश्वासात न घेता केलेल्या नियुक्त्या रद्द कराव्यात. माझ्यावर राजकीय दबाव टाकला जातो, हे शब्द मागे घ्यावे.

**मा.महापौर :** सर्व अतिरिक्त पदभाराच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत.

**श्री.संजय जोशी :** आजच सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर तसे आदेश काढावेत.

**मा.महापौर :** मा.आयुक्तांनी केलेल्या अतिरिक्त चार्ज दिलेले आदेश रद्द करण्यात आलेले आहेत. सभा संपल्यावर आदेश काढण्यात यावे.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** अंमलबजावणी करणार आहे का? मा.आयुक्तांचा खुलासा घेण्यात यावा.

**श्री.अजिज जहाँगिरदार :** मा.आयुक्तांना अशी कार्यवाही करण्याचा अधिकार आहे की नाही. एक दिवसाचा चार्ज असो किंवा एक महिन्याचा असो. आयुक्त-आयुक्तच राहतील.

**मा.महापौर :** या संदर्भात निर्णय दिलेला आहे.

**श्री.अजिज जहाँगिरदार :** प्रशासकीय अधिकार महापौरांना देण्यांत यावे, ठराव घ्यावा त्यानंतर असे निर्णय घ्यावेत. यास माझा विरोध आहे.

**मा.महापौर :** सभागृहाच्या सम्मतीने निर्णय घेतलेला आहे.

**श्रीमती अलका पाटील :** मा.आयुक्तांना अधिकार आहे.

**श्री.कैलास गायकवाड :** मा.आयुक्तांनी प्रशासकीय कारणास्तव निर्णय घेतलेला आहे. तो योग्य आहे. जो विरोध होतो त्यास माझा विरोध आहे.

**श्री.भगवान घडमोडे :** मा.महापौरांनी निर्णय दिलेला आहे. आता यावर चर्चा करणे बरोबर नाही.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** मा.महापौरांनी आदेश दिले ते मान्य आहे. परंतू प्रशासकीय अधिकार मा.आयुक्तांना आहे.

**श्रीमती अलका पाटील :** वेळ वाया जात आहे. पुढील विषयावर चर्चा घेण्यांत यावी.

**मा.महापौर :** विषय संपलेला आहे. आता पाणी प्रश्नावर पुढील चर्चा करावी.

**श्री.कवरसिंग बैनाडे :** सिडको हडको भागात पाणी पुरवठ्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. एक दिवसाआड पाणी देऊन ते सुध्दा २०-२५ मिनिटे येते. बऱ्याच लोकांच्या घरी वयोवृध्द लोक घरी असतात. नळाला पाणी नाही, आले तरी टँकरद्वारे पाणी दिल्यानंतर त्यांनी पाणी भरता येत नाही. पाणी पुरवठा सुरळीत केला नाही तर या शहराचे नांव बदनाम होईल.

**मा.महापौर :** प्रत्येक स.सभासदांनी आपआपल्या जागेवरुन बोलावे. (यावेळी स.स.श्री.जावेद कुरैशी यांना जागेवर बसण्याबाबत मा.महापौर ३ वेळा सूचना करतात.)

**श्री.कवरसिंग बैनाडे :** सन १९९५-२००० या दरम्यान मी या महानगरपालिकेचा सभासद होतो. त्या काळात पाण्याच्या टाकीचे काम मंजूर झालेले होते. एन-५ येथील पाण्याची टाकी खराब झालेली आहे. अद्याप त्या टाकीचे काम झालेले नाही. सिडको हडको भागात एक दिवसाआड पाणी दिल्या जाते व एक तास पाणी मिळत नसेल तर फक्त तेथील नागरिकांकडून ९००/- रु.पाणीपट्टी वसुल करावी. किमान एक तास पाणीपुरवठा करण्यात यावा.

**सौ.रजनी जोशी :** सिडको हडको भागात पाण्याचा प्रश्न ज्वलंत झालेला आहे. फक्त १५ मिनिटे पाणी पुरवठा होत आहे. कमी दाबाने पाणी येते. एक्सप्रेस लाईनचे काम सिडको हडकोसाठी करण्यात आले तर पाणी पुरवठा कुठे केला जातो, खुलासा करण्यात यावा. महिलांचा संबंध पाण्याशी निगडित आहे. त्यांना दररोज त्रास सहन करावा लागतो. सिडको हडकोसाठी महानगरपालिका फक्त पाणी देण्याचेच काम करते. व्यवस्थित असा पाणी पुरवठा या भागात करण्यात यावा. १ तास पाणी द्यावे. नियोजित वेळेवर पाणी मिळावे.

**श्री.महेश माळवतकर :** पाण्याचा साठा भरपूर असतांना सिडको हडको भागात कमी प्रमाणात पाणी दिले जाते. या भागात नळ कनेक्शन सर्वात जास्त असून अधिकृत आहे वसुली जास्त प्रमाणात असूनही कमी प्रमाणात पाणीपुरवठा

केला जातो. शहरात काही भागात एक तास दररोज पाणी दिल्या जाते. परंतू सिडको हडको भागाचे नागरिक १८००/- रु.पाणीपट्टी भरत असतांना पाणी कमी का दिले जाते. एक दिवसा आड पाणी आपल्या मनाप्रमाणे दिल्या जाते. या भागात नियमित एक तास पाणी देण्यांत यावे. तरच वसुली करण्याचा हक्क पोहोचतो. सकाळी ५ वा. दुपारी ३ वा. रात्री ८ वा. पाणी पुरवठा केला जातो. शहर सिडको असा भेदभाव होतो. पाणी पुरवठा सुरळीत करावा नसता, जनता रस्त्यावर येईल. हक्काने पाणीपट्टीची मागणी होते. जनता १८००/- पाणीपट्टी भरतात व ३०-३५ मिनीटेच पाणी दिले जाते ते चुक आहे.

**श्री.जहाँगिरदार अजीज :** सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झालेले नाही वाद चालू आहे.

**श्री.रेणूकादास वैद्य :** शहरात पाण्याची टंचाई आहे. ज्योतीनगर क्रांतीचौक, विश्वभारती कॉलनी या भागातही पाण्याची टंचाई आहे. कमी पाणी येते दाब कमी असतो, तशा सुचना कर्मचाऱ्यांना कराव्यात. तसेच कर्मचारी सुचनाचे पालन करीत नाही. नगरसेवकांना उध्दटपणे बोलतात. सन्मानाने बोलले पाहिजे.

**श्री.मेघावाले मोहन :** सिडको हडको भागासाठी एक्सप्रेस लाईनचे काम करण्यात आले त्यातील काही पाणी शहरात जाते. सिडको-हडको भागातील वसुली जास्त होते, पाणी कमी दिल्या जाते, हे आम्ही सहन करणार नाही. अन्याय आहे, सर्व नागरिक रस्त्यावर येतील.

**श्री.संजय जोशी :** पाणी प्रश्नावर चर्चा होत आहे. प्रशासनाचे मत घ्यावे. याबाबतीत एक विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करावी, सर्व प्रश्न मांडता येतील.

**श्री.संजय केनेकर :** शहरात सूंपर्ण ठिकाणी पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. जेथे अनिधकृत नळ आहे तेथे पाणीपट्टी नाही, पण पाणी पुरवठा भरपूर होतो. आपले कर्मचारी वसुलीसाठी सुध्दा जाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. जेथे वसुली होते तेथे दिवसाआड पाणी दिले जाते. अनिधकृत नळांना भरपूर पाणी दिले जाते, असे का. दररोज पाणी देण्यांत यावे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** सिडको प्रमाणे शहरातही ३५ मिनीटेच पाणी दिल्या जाते. शहरात येणारा पाणीसाठा किती. पाणी साठवन टाकी भरत नाही तर पाणी येणार कोठून, टाकी भरण्यास ४ ते ६ तास लागतात. पंपीगवर लोडशेडींग नको डायरेक्ट लाईन असावी. पाणी पुरवठा विभागाने कार्यवाही करावी.

**सौ.विजया रहाटकर :** शहरात पाणी टंचाई फार भीषण ठरत आहे. संपूर्ण शहरातच हा प्रश्न गंभीर झालेला आहे. सिडको हडकोच नव्हेतर संपूर्ण शहराचा विचार करणे व तसा विषय घेणे आवश्यक आहे. नगरसेवक बोलतात अधिकारी तितकेच प्रयत्न करतात. अधिकारी उत्तम प्रयत्न करीत आहे. पाणी चांगले येत नाही जेव्हाही बोलविल्यास अधिकारी हजर राहतात. ही भुमिका सकारात्मक आहे हे असून चालणार नाही. त्यातून मार्ग काढावा लागेल. नगरसेवक फिरतात काहीच साध्य होत नाही अशी परिस्थिती सध्या आहे. आता पुन्हा नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. झोन नं.४ हा सर्वात जास्त वसुलीचा भाग आहे. परंतू परिस्थिती अशी आहे की, नळांना एक तास पाणी देऊन ही थेंबभर पाणी नसते. त्यासाठी नियोजन करुन पाणी पुरवठा सुरळीत कसा होईल, याकडे लक्ष द्यावे.

**श्री.दिलीप गायकवाड :** हर्सुल तलावातील लोक माती घेऊन जात आहे. तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. लोक शेती करीत आहे. तेथील अतिक्रमणे काढून तलावातील गाळ काढल्यास तेथे पाणी साठा करता येईल व शहरात पाणी घेता येईल. प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** पाणी प्रश्न हा मोठा प्रश्न शहरासाठी गंभीर स्वरुप धारण करीत आहे. सिडको व शहरासाठी पाणी कसे व्यवस्थित देता येईल वितरण व्यवस्थेचा गांभीर्याने विचार व्हावा. वसुलीचा विचार केला तर झोन क्र.७ ची सर्वात जास्त आहे. ८ झोन पैकी नंबर १ ची वसुली झोन क्र.७ मध्ये झालेली आहे. शहरात काही भागात २-२ तास पाणी येते. परंतू सर्वात जास्त वसुली या भागाची आहे. गांभीर्याने पाणी पुरवठ्यावर तेथे विचार केला पाहिजे. १५ मार्च पासून सिडको व शहर पाणी पुरवठा यात फार तफावत झालेली आहे. विसंगती निर्माण झाली, सिडकोतील प्रश्न अत्यंत महत्वाचा असून त्या भागात फक्त महानगरपालिका पाणी पुरवठाच करते. पाणी पुरवठा व्यवस्थीत करीत नसाल तर इतर सुविधा देणार की नाही हा प्रश्न हस्तांतरण झाल्यावर जनतेला पडेल. आताच हस्तांतरणाचा विषय झाला परंतू सर्वात जास्त वसुली ही सिडको हडको भागातील आहे. सिडकोची पाईप लाईन मनपाकडे हस्तांतरण झालेली आहे. ३ महिन्यापासून जो पाणी पुरवठा होतो तो अतिशय कमी आहे. फक्त २० मिनीटे पाणी येते. १ तास पाणी देण्यांत यावे.

**सौ.सुशिला रगडे :** अशी परिस्थिती आहे की, हनुमाननगर, मातोश्रीनगर भागात वेळेवर टँकरचे पाणी येत नाही. लोकांनी पैसे भरणा केलेले आहे. रात्री १०-१० वाजता टँकर येते. टँकर आले नाही तर लोकांना कुठे जाता येत नाही. केव्हा तर लाईट नसते त्यामुळे पाणी भरण्यास त्रास होतो. त्या भागात बोअर नाही. पाण्याची पाईप लाईन नाही म्हणून टँकर हे वेळेवर यावे अशी विनंती आहे.

**सौ.खॉन मेहेर उन्नीसा हमीद :** वार्ड क्र.२८ मध्ये पाणी पट्टी पूर्ण वर्षाची वसुल केली जाते. पाणी मात्र ६ महिने दिले जाते, असे का होते, खुलासा करावा. रेग्युलर पाणी दिले पाहिजे. या बाबत अधिकाऱ्यांकडे तक्रार ही केलेली आहे. काहीही कार्यवाही होत नाही.

**श्री.वसंत नरवडे :** स.सदस्य सुचना करतात. याची नोंद संबंधित अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. प्रथमतः ही नोंद घेतली जाते का, याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी नोंद घेत आहे त्यानुसार ते खुलासा करतील तसेच पूर्ण नोंद इतिवृत्तात घेतली जाते.

**श्री.वसंत नरवडे :** या शहरातील पाणी पुरवठ्याच्या बाबतीत संबंधित विभाग व तेथील कर्मचारी यांचेतील आलेली मरगळ आणि जनतेला वेळोवेळी न होणारा पाणीपुरवठा याबाबतीत समन्वय घातल्याशिवाय पाणी पुरवठा सुरळीत होणार नाही. पाणी भरपूर असतांना विस्कळीतपणा येत आहे. पाण्याचा पुरवठा कमी होतो. काही ठिकाणी दुर्गंधीयुक्त पाणी येते. अधिकाऱ्यांना अनेक वेळा दुरध्वनी केले. मोबाईल केल्यास कोणी उचलत नाही. जलकुंभाकडे गेल्याचे सांगतात. त्यानंतर अधिकारी भेटत नाही. नगरसेवकांना मागे फिरावे लागते. म्हणून उपअभियंता, शाखा अभियंता हे सकाळी कोठे असतांत त्यांचेवर कुणाचे नियंत्रण असते हे पाहणे सुध्दा

गरजेचे आहे. असलेल्या वेळात नागरिकांना पाणी मिळते का, पाणी बरोबर सुटते का. कर्मचारी जागेवर आहेत का. आज रोजी वॉल उघडल्यानंतर नगरसेवकांना फिरावे लागते अशी वेळ आलेली आहे. पाणी कमी नाही परंतू पाण्याच्या यंत्रणेवर आलेली मरगळ कर्मचारी / अधिकारी यांचे नियंत्रण न राहिल्यामुळे हा मोठा दोष आहे तो काढला गेला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी दुर्गंधीयुक्त पाण्याच्या तक्रारी आहेत. त्या बाबतीत तात्पुरती कार्यवाही होते, गुलमंडी औरंगपुरा भागात दुर्गंधीयुक्त पाणी येते. माझ्या घरासमोर पाणी वाहते. याबाबतीत कार्यवाही करण्याचे आदेशित करावे व पाणी पुरवठा यंत्रणेबाबत एक कार्यशाळा अधिकाऱ्यांची घेण्यांत यावी अशी माझी सुचना आहे.

**सौ.अनिता घोडेले :** अनिधकृत वसाहतीमध्ये पाण्याच्या सुविधा नाही टॅक्स घेतल्यास पाणी पुरवठा होऊ शकेल का. या बाबतीत आपली काय उपाययोजना आहे.

**श्री.सय्यद खुसरो बुऱ्हानोद्दीन :** पाण्याचा प्रश्न तर आहेच परंतू पावसाळ्याचे दिवस जवळ आलेले आहे. नाल्याची साफसफाई झाली पाहिजे. दुर्गंधीयुक्त पाणी घरात जाते. पावसाळ्यापुर्वी साफसफाई व्हावी मंदिर मज्जीदमध्ये पाणी जाते.

**मा.महापौर :** स.सदस्य सुचना करीत आहे. पाणी पुरवठा अधिकारी यांनी सर्व नोंद घ्यावी त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** पाण्याच्या टाकीमध्ये भरपूर पाणी भरावे व जोपर्यंत सपोर्ट देणार नाही. तोपर्यंत जास्त दाबाने पाणी येणार नाही. नागरिक विद्युत मोटार लाऊन पाणी घेतात. ज्यांच्याकडे मोटार नाही त्यांना पाणी मिळत नाही. म्हणून या बाबत कडक निर्णय घेत नाही. तो पर्यंत हे असेच चालू राहील. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा नंतर आपण आपले रुलींग द्यावे. तसेच वार्डातून प्रत्येक नगरसेवक काम करावे म्हणून सूचना करतात. त्यांचे वार्डातील जनतेची पैसे भरणा केले किंवा नाही घर टॅक्स नळ टॅक्स ही असेल परंतू एक नामनिर्देशित सदस्य म्हणतात टॅक्स भरत नाही जेथे वसुली होत नाही. तेथे कर्मचारी द्यावेत. स्वीकृत सदस्यांनी वसुलीसाठी प्रयत्न करावे.

**श्री.बन्सीलाल गांगवे :** सिडको हडकोमध्ये ११ वी स्कीमचे घरे आहे. तेथे सिडकोने पाईपलाईन टाकलेली असून अतिशय निकृष्ट दर्जाची आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना पाणी पुरवठा होत नाही. सदर पाईप लाईन लहान आकाराची आहे. सदरची पाईप लाईन मनपाकडे हस्तांतरणासाठी पैसे भरणा केलेले आहे तर ती पाईप लाईन हस्तांतर झालेली आहेत का. याचा अधिकाऱ्यां कडून खुलासा घ्यावा.

**श्रीमती अलका पाटील :** वॉर्ड क्र.११ मध्ये पानचक्की भागात १०-१५ मिनीटे पाणी दिले जाते. तेथील नाशिक खाम नदीवर एक झरा आहे. तेथील पाणी पिण्यास वापरतात. त्यांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. म्हणून या भागात जास्तीत जास्त पाणी पुरवठा करण्यात यावा.

**श्री.जहॉंगिरदार अजीज :** जायकवाडी मध्ये मुबलक पाणी आहे. २ फिल्टर प्लॅटंची आवश्यकता आहे. आणखी एक ची तरतूद करावी लागेल.

**श्री.हिम्मतराव दाभाडे :** उस्मानपुरा वार्ड क्र.९० उस्मानपुरा, एकनाथनगर, शाह कॉलनी या भागात कमी दाबाने पाणी दिल्या जाते. जनतेला ४ फुट खड्ड्यातून पाणी भरावे लागते. अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तक्रारीही केल्या, परंतू अधिकाऱ्यांनी

यामध्ये लक्ष दिलेले नाही. फुलेनगर, एकनाथनगर, शहा कॉलनी, संजय नगर या भागात कमी दाबाने पाणी येते. जास्त दाबाने पाणी कसे येईल यासाठी संबंधित अधिकारी यांना आदेशित करावे.

**सौ.ससाणे सरिता :** माझ्या वार्डात जास्त कामगार लोक असून स्लम भाग आहे. या भागात पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. कामगार वर्ग संध्याकाळी येतो त्यांना पाणी मिळत नाही. ठराविक वेळ ठरवून पाणी पुरवठा करण्याच्या सूचना कराव्यात.

**सौ.खॉन अजरा जबीन :** शताब्दीनगर भागात शेवटपर्यंत पाईप लाईन नाही. फक्त २० मिनीटे पाणी सोडण्यांत येते. ५०० फुट दुरवरुन पाण्याची लाईन घेतलेली आहे. एक हंड्यापेक्षा जास्त पाणी मिळत नाही. न्यु रशिदपुरा, शताब्दीनगर भागात ४ गल्ल्यात पाणी येत नाही. जेव्हा पाणी येते तेव्हा लाईट सुध्दा बंद होते. विनंती की या भागात जास्तीत जास्त पाणी पुरवठा करावा.

**सौ.शमशाद बेगम :** वार्ड क्र.५३ बारी कॉलनी येथे दुषित पाणी येते ते दुषित पाणी ताबडतोब बंद करावे.

**श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन :** पाण्याची टंचाई सर्वत्र आहेत. सिडको व शहरात सुध्दा आहे. खुप ठिकाणी विहीरीत पाणी आहे. विद्युत मोटार लावून पाणी देऊ शकतो. माझ याही वार्डात विहीर आहे. वापरण्यासाठी पाणी देऊ शकतो. पानझडे साहेबांना याची कल्पना दिलेली आहे. पडेगांव भिमनगर भावसिंगपुरा भागात दोन-तीन दिवसाआड पाणी येते. विहीरी साफ कराव्यात त्यावर विद्युत मोटार बसावाव्यात पडेगांव येथे एका विहीरीवर पंप बसवून पाणी पुरवठा होतो. इतर ठिकाणी व्यवस्था करावी.

**श्री.महेश माळवतकर :** काही भागात अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. त्यांना २४ तास पाणी असते असे नळ कनेक्शन बंद करावेत. खाम नदीवरील काही लोक विहीरीचे पाणी विक्री करतात अशा विहरी मनपाने अधिगृहीत करावे.

**श्री.गवळी रविकांत :** जायकवाडी प्रकल्प जेव्हढा महत्वाचा आहे. तेवढाच हर्सूल सुध्दा आहे. हर्सुल तलावापासून जी पाईप लाईन आहे ती फार जुनी आहे. नवीन पाईप लाईन टाकण्यांत यावीत अशी विनंती करतो.

**श्री.दामोधर शिंदे :** क्रांतीचौक ते सिडको पाईप लाईनवर डायरेक्ट नळ कनेक्शन घेतलेले आहे. अधिकाऱ्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही ते बंद केल्यास टाकीमध्ये १० टक्के पाणीसाठा वाढेल.

**श्री.मिलींद दाभाडे :** जेथे पाणी दिले जात नाही. तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्यात यावा.

**श्री.खेंडके संतोष :** वार्ड क्र.७१ मध्ये आम्ही पाण्याचे पैसे भरतो टँकर वेळेवर येत नाही. २-२, ४-४ दिवस पाणी येत नाही.

**श्री.पुरुषोत्तम ठाकुर :** नंदनवन कॉलनी भागात कमी दाबाने पाणी मिळते त्यामुळे सर्वांना पाणी मिळत नाही. अधिकाऱ्यांना तशा सूचना कराव्यांत.

**श्री.शशांक विसपुते :** गारखेडा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो. बऱ्याचदा टँकर येण्याचा खंड पडतो. नागरिक आम्हाला विचारतात टँकर आले नाही. टाकीवर विचारणा केली तर टँकर भरुन गेले असे सांगतात. त्यासाठी संबंधित जो कुणी वाहन चालक असेल त्यांनी खेप टाकल्यानंतर तेथील नागरिकांची सही घेतली पाहिजे याची माहिती नगरसेवकांना दिली पाहिजे.

**श्री.मोहमंद जावेद कुरैशी :** पाणी प्रश्न हा जुनाच आहे. पुर्वीच्या सदस्यांना सर्व माहिती आहे. १ तासापासून चर्चा होत आहे. जायकवाडी पासून जी पाईपलाईन टाकलेली

आहे. ती २५-२६ वर्षापुर्वीची आहे ही पाईप लाईन बदलावी नवीन पाईप लाईन टाकण्यांत यावी. या शहरासाठी १५० एम.एल.डी. पाणी लागते ते आणण्यासाठी प्रयत्न करावेत. लोड शेडींग साठी प्रशासनाने प्रस्ताव तयार केला त्यास तात्काळ मंजूरी देऊन टाकीमध्ये पुर्णतः पाणी कसे भरेल याकडे लक्ष द्यावे. तसेच ज्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो. ते वेळेवर गेले पाहिजे माझ्या वार्डात दिल्ली गेट कडून फक्त एक १५० एम.एम.ची पाईप लाईन येते त्यावर ३०-३५ हजार लोकसंख्येस पाणी पुरवठा केला जातो. ती लहान पडते त्यासाठी ३०० एम.एम. किंवा ३५० एम.एम.ची पाईप लाईन टाकण्यांत यावी. जायकवाडी पासून औरंगाबाद शहरासाठी नवीन पाईप लाईन टाकण्यांत यावी तरच खऱ्या अर्थाने पाणी जनतेला मिळेल.

**श्री.कचरु मोरे** : मी प्रभाग क्र.९२ बद्दल बोलतो. झोपडपट्टीचा भाग आहे. एक दिवसाआड पाणी येते. मुबलक पाणी येत नाही. ३० वर्षापुर्वीची जलवाहिनी आहे. पाईप लाईन मध्ये मुळ्या गेल्या आहेत. विनंती आहे की, ही वसाहत गोरगरीबांची आहे. नवीन जलवाहिनी टाकावी, भगीनींना पाणी भरावे लागते, या भागात सुलभ शौच्छालय आहे, तेथे देखील पाणी नाही. पिण्याचे पाणी देखील व्यवस्थित मिळत नाही. कृपया गांभीर्याने लक्ष द्यावे.

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी जेवढ्या तक्रारी आहेत, त्यांचा खुलासा करावा.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सदस्यांनी त्यांचे वार्डातून व काही प्राथमिक स्वरुपाच्या तक्रारी केलेल्या आहेत. या सभागृहात थोडक्यात माहिती देतो की, जुन्या स.सदस्यांना पाणी पुरवठ्या संबंधी सर्व माहिती आहेतच. जे नवीन स.सदस्य आहेत, त्यांचे माहितीसाठी थोडक्यात असा खुलासा करण्यांत येतो, या शहरासाठी जायकवाडी जलाशयातून पाणी पुरवठा होतो. त्याचप्रमाणे जुनी योजना जी हर्सुल तलावाची आहे, तेथून सुध्दा पाणी घेण्यांत येते. तसेच काही प्रमाणात नहर-ए-अंबरीतून पाणी घेण्यांत येते. सध्या उन्हाळा असल्यामुळे या नहरीला पाणी नाही. उन्हाळामध्ये साधारण ४-५ महिने त्या नहर ए अंबरीला पाणी नसते. मुख्यत्वे शहर हे जायकवाडीच्या पाण्यावर अवलंबून आहे. जायकवाडी जलाशयात सध्या भरपूर पाणी आहे. गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी चांगली स्थिती आहे. जी योजना होती ती २००० पर्यंतची लोकसंख्या विचारात घेवून केलेली होती. २००० साला पर्यंतची योजना २००५ वापरित आहोत. २००५ नंतर पुढे १०-१५ वर्ष पाणी कमी पडू नये म्हणून ६७ कोटीची योजना तयार केलेली होती. या एक्सप्रेस लाईनचे वगळता उर्वरीत सर्व कामे करणे आणखी बाकी आहे. सर्वसाधारण सभेत सविस्तर प्रस्ताव सादर केलेला होता, एकमताने मंजूरी सुध्दा दिलेली होती, तो प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. मंजूरी मिळालेली नाही. पाणी पुरवठ्याची योजनेची क्षमता ९९-२००० पर्यंतच पुरविणारी होती. परंतू कसे तरी करुन काही भागांना एक दिवसाआड पाणी देऊन ही योजना चालवित आहोत. म्हणून प्रथमतः ही योजना सशक्त बनवावी लागणार आहे तर पाणी पुरवठ्याचे लहान-मोठे प्रश्न सुटतील उदा.पाणी कमी येणे, कमी दाबाने पाणी येणे. किंवा नवीन वस्त्या आहेत त्यांची सुध्दा आता मागणी होत आहे आणि शहराचा विकासच करावयाचा असेल तर शहराला पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. पाणी पुरवठ्यात जो कर्मचारी आहे तो मेहनतीने काम करीत आहेत. पहाटचे ४.०० वाजेपासून ते

रात्री १२.०० वाजेपर्यंत कर्मचारी काम करीत असतात. काम करीत नाही. कर्मचारी कमी पडतात असा काही गैरसमज करुन घेऊ नये. प्रत्येक कर्मचारी मनमिळाऊपणे काम करीत आहे. पाणी वेळेवर न येण्याचे कारण लोड शेडींग चालू आहे. महाराष्ट्र विद्युत मंडळाचा तो प्रश्न अतिशय भेडसावत आहे. यासाठी १.०८ कोटीचा प्रस्ताव तयार केलेला आहे. शहरातील पंपीग स्टेशन आहेत ते लोडशेडींगच्या मुळे ग्रासलेले आहे. त्यामुळे पाणी वेळेवर देता येत नाही. लोडशेडींगचा निश्चित असा वेळ नाही. आज ३.०० ते ६.०० असते तर उदया ६.०० ते ९.०० तर परवा ९.०० ते १२.०० असते उपाय म्हणून म.रा.वि.मंडळाशी पत्र व्यवहार केला. त्या विभागाच्या अभियंत्याबरोबर सर्व्हे केला. १.०८ कोटीचा प्रस्ताव तयार करुन सादर केलेला आहे. ती लेखा विभागाकडून पुढे येईलच यामुळे लोड शेडींगचा प्रश्न सुटला तर निश्चितपणे वेळेवर पाणी देता येईल. सिडको हडकोत ८० टक्के भाग कमी उत्पन्न गट मध्यम उत्पन्न गटातील लोकांची घरे आहेत. तसेच सिडको हडको भागात पूर्वी एक तास पाणी दिले जाते होते. परंतू अनेक वेळा असे दिसून आले की, लोक रस्त्यावर जुने पाणी टाकून देत असतात. नवीन आजचे पाणी भरत असत. काही ठिकाणी वाहन धुणे, कपडे धुण्याचा प्रकार चालतो. हा वादाचा मुद्दा नाही मी चुकीचे बोलत नाही. सत्यपरिस्थिती आहे. आज माझ्या बरोबर प्रत्यक्ष भेट घेऊ अनेक ठिकाणी नागरिक पाणी वाया घालवितात त्यामुळे थोडासा वेळ कमी केलेला आहे. मा.उपमहापौर यांचे दालनात सुध्दा चर्चा झालेली होती. यात नियोजन करीत आहोत. शिल्लक राहिलेले पाणी इतरांना देता येईल. साधारणतः ३०-३२ एम.एल.डी. पाणी पुरवठा सिडको हडको भागासाठी सध्या होतो. एकूण पाणी हे ११० एम.एल.डी. येते. त्यापैकी सिडको हडको भागाची लोकसंख्या विचारात घेतल्यास माझ्या माहिती प्रमाणे १३० लि.प्रति व्यक्ती प्रति दिवस पाणी देण्यांत येते. आता प्रश्न दररोज पाणी देण्याचा परंतू येणार पाणी कमी आहे ते कोणी ही मान्य करेल. त्यानंतर एक्सप्रेस लाईन टाकलेली आहे. नक्षत्रवाडी पर्यंत पुर्वी एकच पाण्याची लाईन होती. त्यानंतर तेथून एक्सप्रेस लाईनचे काम केले. त्यामुळे जो पाण्याचा दाब होता. तो कमी झालेला आहे. त्या पाणी साठ्यात दोन ठिकाणी विभागणी झालेली आहे. दाब कमी होतो. त्यामुळे उंचावरच्या ज्या टाक्या आहेत. त्या भरल्या जात नाही. टाकी भरण्यासाठी वॉल बंद करुन टाकी भरुन घेतली जाते. त्यासाठी उशीर लागतो असे करुन कसे तरी एक दिवसा आड का होईना पाणी पुरवठा केला जातो. प्रती व्यक्ती प्रति दिवस १३० लीटर पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत. राहीला प्रश्न शहर आणि सिडको भागासाठी देण्यात येणारे पाण्यात थोडीसी तफावत आहे. काही ठिकाणी जास्त पाणी तर काही ठिकाणी कमी पाणी येते. हे मान्य असून तो उताराचा भाग असतो. काही ठिकाणी चढ असतो. त्यासाठी सध्या तरी नाविलाज आहे. आताच काही सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की काही भागात दररोज पाणी येते जी जुनी वसाहत आहे. उदा.गुलमंडी, राजाबाजार, कबाडीपुरा औरंगपुरा असेल साधारणतः ५० वर्षापुर्वीची पाईप लाईन टाकलेल्या आहेत. त्या लाईनचे नेटवर्क आजही महापालिकेकडे उपलब्ध नाही हे नमूद करतो. तीन टाकीमधील पाणी एकाच वेळी सोडावे लागते. त्यामुळे त्या भागात पाणी

मिळते. मुळ कारण असे आहे की, जी ६७ कोटीची योजना आहे. ती पूर्ण झ ाली पाहिजे. त्या पाण्यात वाढ होण्याच्या दृष्टीने एक योजना सादर केलेली होती. त्यात ५-६ कोटीची कामे करीत आहेत. काही ठिकाणी नवीन पंप बसवित आहोत. काही जुने पंप बदलण्याचे काम हाती आहे. ८-१० एम.एल.डी. पाणी वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत ते जास्तीत जास्त २-३ वर्ष चालेल पुन्हा पाण्याची ओरड सुरु होईल. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील पाणी पुरवठ्यावर ताण आलेला आहे. ही योजना लवकरच करावी लागणार आहे. त्यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे, राहीला प्रश्न दुर्गंधी पाण्याचा त्या बाबत मी नोंद करुन घेतलेली आहे तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो.

**श्रीमती रजनी जोशी :** सिडको हडको भागात पाणी सोडतांना अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. पुर्वी १ तास पाणी येत होते. आता ३०-३५ मिनीटे पाणी येते. अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करु नये.

**श्री.संजय केनेकर :** जो अभ्यासपुर्वक खुलासा अधिकाऱ्यांनी केला तो अत्यंत चांगला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. जे कर्मचारी पाणी पुरवठा करण्यासाठी काम करतात. त्यांचे अभिनंदन करतो. माझा प्रश्न असा होता की, जी जुनी जलवाहिन्या आहेत, त्या बदलाव्यात तसेच चोरी जाणारे पाणी व वाया जाणारे पाणी याकडे लक्ष दयावे. तसेच सरकारी नळ दिले, त्याचे पाणी सुध्दा वाया जाते.

**श्री.गजानन बारवाल :** खुलासा झाला, चालु योजना ही फक्त २००० पर्यंतची होती. तसेच ६७ कोटीची योजना तशी पडून आहे, हे सुध्दा खुलासा केला. तसेच जुन्या जल वाहिनीचे नकाशे सुध्दा नाही असे म्हटले, हे सत्य असतांना सुध्दा यासाठी काही तरी चांगले नियोजन करण्याची गरज आहे. कमेटी नियुक्त करावयास पाहिजे, विशेष सभा घ्यावयास पाहिजे व हा प्रश्न त्यातून सोडवला गेला पाहिजे.

**श्री.कैलास गायकवाड :** जे सात अधिकारी निलंबित केले, त्यांची खातेनिहाय चौकशी कोणी केलेली होती. कशाच्या आधारे निलंबित केले.

**मा.महापौर :** पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे, त्यावर चर्चा करावी.

**श्री.संजय शिरसाट :** दरवर्षी उन्हाळ्यापुर्वी विहीरीची साफसफाई करण्यांत येते. यावर्षी किती साफसफाई केली व किती पाणी घेतो, खुलासा करावा.

**श्री.महेश माळवतकर :** आताच खुलासा झाला, त्यामध्ये सिडको हडको भागात किती पाणी देता हे लक्षात आले. शहरात दररोज पाणी देतात. एखाद्या वेळेस झाडाला पाणी मारतांना बघितले. तर नेहमीच बोलतात, पाहणी करतात, नकाशे बघतात. शहरामध्ये अनेक भागात तीन-तीन तास पाणी येते. सिडको-हडको भागात ३०-३५ मिनीट पाणी सोडतात तर नकाशे उपलब्ध करुन घेतले पाहिजे. शहरात लिगल वस्ती किती व त्यांना किती पाणी देतात त्याची सुध्दा पुढच्या सभेत माहिती दिली पाहिजे. जे पाणीपट्टी नियमित भरणा करतात, त्यांना कमी पाणी. जे व्यवसायासाठी पाणी वापरतात अनाधिकृत वस्तीत पाणी देता. ते पाणीपट्टी भरणा करीत नाही. असा भेदभाव किती वेळेस करणार आहे. शहराच्या कुठल्याच योजना आम्ही करु शकलो नाही. हे स्पष्ट सांगावे. २००० पर्यंतची योजना होती तर ५ वर्षे पाणी पुरवठा झाला व्यवस्थापनेच्या बाबतीत लक्ष दिले का? शहरात जसे पाणी दिले जाते तसेच

सिडको हडको भागात देण्यात यावेत. आम्हाला वेगळे समजू नका, आम्हीही शहराचे नागरिक आहोत. समान न्याय द्यावा.

**श्री.अ.रशिद खान (मामू) :** जुन्या लाईनचे नकाशे नाही म्हणता, परंतू पुर्वी ठेकेदार म्हणून अजीज साहेब काम करीत होते. ते घासमंडीत राहतात त्यांना घेऊन प्रशासनाने पाहणी केली तर जुन्या पाईप लाईनची माहिती मिळेल. आपण पत्र देऊन सुध्दा विनंती करु शकता. तसेच जी स्कीम राबवायची त्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली कमेटी तयार करावी. कमेटीने मुख्यमंत्री यांची भेट देऊन कार्यवाही करावी. काही भागात विद्युत मोटारी लावून पाणी घेतात ते बंद करावे. नळाला तोटी असाव्यात. क्रांतीचौक पाण्याच्या टाकीतून टँकरमध्ये पाणी भरले जाते तेथेही पाणी वाया जाते. भरल्यानंतर पाणी चालूच असते. कमीत कमी १० टँकर पाणी वाया जाते. याकडे लक्ष द्यावे. जी कमेटी नियुक्त होईल, त्या कमिटीने याचा अभ्यास करावा.

**कार्य.अभियंता (पापु) :** नकाशे नाही, असे नाही. जो जुन्या शहराचा भाग आहे त्याची तपासणी करावी लागेल.

**मा.महापौर :** पाणी प्रश्नावर स.सदस्यांनी उत्तम अशी चर्चा केलेली आहे. अधिकारी यांनी खुलासा केला, त्यावेळी बोलले की, १.०८ कोटीचा भारनियमन संदर्भात प्रस्ताव तयार केलेला आहे, तो लवकरच मंजूरीसाठी ठेवण्यांत यावा तसेच ६७ कोटीचा जो प्रस्ताव आहे, त्यास मंजूरीसाठी मा.मुख्यमंत्री आले तेव्हा त्यांना प्रत दिलेली आहे. त्यांना वेळ मागितलेली आहे, लवकरच ते बोलावतील अशी अपेक्षा आहे. आताच स.सदस्यांनी ज्या तक्रारी केल्या, त्याची नोंद घेऊन सिडको हडको भागाकडे विशेष असे लक्ष देऊन पाणी पुरवठा कसा सुरळीत होईल याकडे लक्ष द्यावे. आजची सभा १/२ तासासाठी तहकूब करण्यांत येत आहे. (वेळ १.४० वाजता सभेला सुरुवात २.३५ वाजता)

**मा.महापौर :** विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**नगर सचिव :** दि.१६.०५.२००५ रोजी मा.आ.डॉ.निलम गोऱ्हे यांनी घेतलेल्या महापालिका स्त्री केंद्री आर्थिक नियोजन बैठकीत झालेल्या व आ.गोऱ्हे यांची मा.महापौरांशी जी चर्चा झाली, त्यानुसार दि.१९.०५.२००५ च्या सर्वसाधारण सभेत सर्व स.सदस्यांना सन २००५-०६ महापालिका अर्थसंकल्पीय तरतूदीसाठी खालीलप्रमाणे सुचना द्याव्यात.

१) औरंगाबाद शहरात महिलांसाठी मार्केटच्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, अशा ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्याबाबतचे प्रस्ताव स.सदस्यांनी जागा निश्चित करुन मा.महापौरांकडे सादर करावेत.

२) महानगरपालिकेच्या शाळामध्ये मुलींसाठी टॉईलेट उपलब्ध नाही. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या प्रभागातील महापालिका शाळांमध्ये स्वच्छतागृह बांधणे बाबतचे प्रस्ताव मा.महापौर यांचेकडे सादर करावेत.

यासाठी दि.३० मे पर्यंत प्रस्ताव अपेक्षीत आहे. जेणेकरुन सन २००५-०६ च्या महापालिका अर्थसंकल्पात याचा समावेश होऊ शकेल.

**विषय क्र.५/१ :**

दिनांक २९.०४.२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद :**</u>

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** या प्रस्तावात श्रध्दांजली अर्पण करण्यात आलेली होती, त्यांचे कुटूबियांना पत्राने तसे कळविणे, अशी दुरुस्ती करावी.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे. श्रध्दांजली संबंधात हित संबंधीतांना कळविण्यांत यावे.

**ठराव :**

दिनांक २९.०४.२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग आदेश क्र.डीपीटी/११/२९९४/प्र.क्र.-६३/ई-१, दि.१६ मार्च, २००५ नुसार श्री.ए.बी.आनंदकर, विशेष भुमी संपादन अधिकारी (उर्ध्व पेनगंगा-१), नांदेड यांची उपआयुक्त (महसुल) महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यांत आली आहे.

करिता श्री.ए.बी. आनंदकर, यांचा रुजू झाल्याचा तारखेपासून म्हणजे दि.०८.०४.२००५ रोजी मध्यान्हपूर्व उपआयुक्त (महसुल), महानगरपालिका औरंगाबाद या पदावर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यांबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

<u>**संवाद :**</u>

**श्री.संजय शिरसाट :** उपआयुक्त यांना एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर घ्यावयाचे, तसा प्रस्ताव आहे. त्यांनी त्यांची ओळख करुन द्यावी. या सभागृहात नवीन सदस्य आहे, कामे करण्यास अडचण येते.

**मा.महापौर :** उपआयुक्त यांना सर्व ओळखतात, प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**श्री.प्रशांत देसरडा :** एक वर्षासाठी प्रतिनियुक्ती असा प्रस्ताव आहे. त्यानंतर जास्त काळ अधिकारी रुजू होत नसतात, त्यामुळे जास्त कालावधीसाठी नियुक्ती देऊ शकतो.

**मा.महापौर :** एक वर्षासाठीचा प्रस्ताव आहे. पुन्हा प्रशासनाने सादर केला तर विचार करता येईल, या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**श्री.संजय शिरसाट :** मी मागणी केली त्यामागे विशेष हेतू होता. महापालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांना विशेष बॅच नसतो. कर्मचारी/अधिकारी हे कोण आहेत. हे स.सदस्यांच्या लक्षात येत नाही. ओळख करुन द्यावी. त्यानुसार अमुक अधिकारी हे आहे. आम्हाला त्यांचेकडे जाता येईल.

**उपआयुक्त (म.)** : मी शासन महसुल विभागातील उपजिल्हाधिकारी संवर्गात असून महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद महापालिकेमध्ये उपआयुक्त (म.) या पदावर दि.०८ एप्रिल, २००५ ते ०७ एप्रिल, २००६ या एक वर्षासाठी मला प्रतिनियुक्तीवर पाठविलेले आहे. माझे नांव अरुण आनंदकर उपजिल्हाधिकारी (महसुल विभाग) महाराष्ट्र शासन, ही प्रतिनियुक्ती महाराष्ट्र शासनाने शासन

निर्णयानुसार एक वर्षासाठी महापालिकेमध्ये केलेली असून हा कालावधी संपण्याच्या अगोदरच आणखी कालावधी वाढविण्याचा अधिकार महापालिकेस आहे. एक वर्षासाठी प्रतिनियुक्ती असून या सभागृहातील सर्व स.सदस्यांचे असेच सहकार्य लाभावे, अशी विनंती आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.ए.बी.आनंदकर, विशेष भूसंपादन अधिकारी, यांची शासन आदेशाप्रमाणे ते महानगरपालिकेत रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.०८.०४.२००५ रोजी मध्यान्हपुर्व पासून उपआयुक्त (महसुल), महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते,

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७/३ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, राज्य शासनाकडून महानगरपालिकेस अनुदान प्राप्त होत असते. प्राप्त होणाऱ्या अनुदानातून महानगरपालिका ही विविध विकास कामे हाती घेवून ती काम पूर्ण करीत असते. शासनाने दिलेल्या अनुदानातून महानगरपालिकेने केलेली कामे योग्य आहेत किंवा नाही? तसेच अनुदानाचा पुर्णतः वापर महानगरपालिकांनी केलेला आहे किंवा नाही? या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन पंचायत राज समितीची स्थापना करीत असून यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे अभिप्राय अपेक्षिले आहेत. या संबंधी निर्णय व्हावा त्या अनुषंगाने शासनास अभिप्राय कळविण्यांत येईल, शिफारस करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजूरीस्तव.

**संवाद :**

**श्री.प्रशांत देसरडा :** हा विषय मंजूर करण्यांस हरकत नसावी, परंतू याच बरोबर शासनाने अनुदान मंजूर केले पाहिजे. अनुदान न पाठवता नुसती कमेटी करणे बरोबर आहे का? आताच स.सदस्य श्री.रशिद खॉन (मामू) यांनी कमेटी करण्याची सूचना केली, ती कमेटी काम करेल, शासनास एक पत्र द्यावे की, कमेटी नियुक्त करत आहेत परंतू त्याच बरोबर अनुदान द्यावे.

**श्री.गजानन बारवाल :** शासनाचे या प्रस्तावानुसार नेमके म्हणणे तरी काय खुलासा करावा.

**सौ.लता दलाल :** या कमेटीत महापालिकेचे कोणी प्रतिनिधी आहेत का? तत्सम म्हणजे आपण मागणी केल्यास ती पूर्ण होऊ शकते का?

**मुख्य लेखाधिकारी :** पंचायत राज समिती ही सध्या जिल्हा परिषदेत सद्यःस्थितीत आहे. ही आमदाराची समिती असते. शासन स्तरावर एक आमदाराची समिती नियुक्त केली जाते जे अनुदान प्राप्त होईल, त्यात कोणती कामे महापालिकेने हाती घेतली आणि ही कामे पूर्वी झालेली आहेत की नाही. शासन स्तरावर आढावा घेतला जाईल. त्यासाठी शासनाने सर्व महानगरपालिकेस जिल्हा परिषदेच्या धर्तीवर असावी का. म्हणून महापालिकेचे अभिप्राय मगाविलेले आहे. त्यामुळे सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

**श्री.गजानन बारवाल :** धोरण ठरवायचे असल्यामुळे कमेटी ही असावयास पाहिजे. काही अनुदान शासनाकडून मिळालेले आहेत का?

**मुख्य लेखाधिकारी :** चालु आर्थिक वर्षात शासनाकडून १.२० कोटी रुपयाचे अनुदान मिळालेले आहे. आणि जो अनुशेष आहे तो गत ५ वर्षाचा म्हणजे ११ कोटीचे अनुदान शासनाकडे थकीत आहेत. ११ कोटी कुटूंब कल्याण व मलेरिया य संदर्भाने शासनाकडे अनुदान थकीत आहे.

**श्री.गजानन बारवाल :** थकीत अनुदान मिळण्या संदर्भात पाठपुरावा करुन जास्तीत जास्त अनुदान कसे मिळेल यासाठी प्रयत्न करावे.

**सौ.लता दलाल :** शासनाच्या अनुदानावर नियंत्रण ठेवण्यासाठीच ही पंचायत राज समिती आहे. शासनाने गेल्या ५ वर्षात हा महापालिकेवर अन्यायच केला असे म्हणणे योग्य होईल. मोठे अनुदान या महापालिकेस मिळालेले नाही ते मिळावे यासाठी प्रस्तावात तशी दुरुस्ती करण्यांत यावी. थकीत तर अनुदान द्यावेच. परंतू महापालिकेच्या ज्या योजना असतील, ड्रेनेज, रस्त्याच्या, पाणी पुरवठ्याच्या असतील ते अनुदान मिळणे अपेक्षित आहे ते द्यावे. तसे प्रस्तावात नमूद करावे व जो प्रस्ताव पंचायत राज समितीला पाठवायचा त्यात ही तसा उल्लेख करण्यात यावा.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** प्रस्ताव मंजूर करावा. परंतू एक कमेटी नियुक्त करावी. सर्व पदाधिकारी व ज्येष्ठ सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन कार्यवाही केल्यास योग्य होईल.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** ११ कोटीचे अनुदान घेण्या संदर्भात पाठपुरावा करावा. पंचायत राज समिती ही शासन पातळीवर होणार आहे. त्यास मान्यता द्यावी. वेगळी दुसरी कोणती समिती करणार आहात.

**मा.महापौर :** महापौर म्हणून मा.मुख्यमंत्री यांना एक निवेदनही दिलेले आहे, लवकरच वेळ देतील अशी अपेक्षा आहे. आघाडीच्या सर्व नगरसेवकांना विनंती सहकार्य करतील. त्यासाठी लवकरच एक समिती नियुक्त केली जाईल. विषय क्र.३ मंजूर करण्यांत येत आहे.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** ११ ते १५ सदस्यांची कमेटी नियुक्त करावी. जास्त नियुक्त केल्यास खर्च करण्याबाबत अडचण निर्माण होईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** कोणते सदस्य कमेटीत घ्यावयाचे हे अधिकार मा.महापौरांना देण्यांत यावे. सर्व पदाधिकारी बसून निर्णय घेतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्य शासनाकडून महानगरपालिकेस अनुदान प्राप्त होत असते. प्राप्त होणाऱ्या अनुदानातून महानगरपालिका ही विविध विकास कामे हाती घेवून ती काम पूर्ण करीत असते. शासनाने दिलेल्या अनुदानातून महानगरपालिकेने केलेली कामे योग्य आहेत किंवा नाही या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन पंचायत राज समितीची स्थापना करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८/४ :**

मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-१०/२००४/प्र.क्र.-१२१/नावि-२०, दि.०७.०९.२००४ अन्वये जैन धर्मीयांचे पयुर्षण

पर्व श्रावण वैद्य-१२ व भाद्रपद शुध्द-४ या दोन दिवशी कत्तलखाने व मांस विक्री बंद ठेवण्याबाबत शासनाने आदेशित केले आहे.

त्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील कत्तलखाने व मांस विक्री दरवर्षी श्रावण वैद्य १२ या दिवशी गणेश चतुर्थी मुळे कत्तलखाना बंद ठेवण्यांत येते. भाद्रपद शुध्द ४ या एक दिवसाकरिता कत्तलखाने व मांस विक्री यापुढे बंद ठेवण्याबद्दल प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गजानन बारवाल :** दोन दिवस कत्तलखाने बंद ठेवण्यांचा विषय आहे. नम्र निवेदन करतो की, शहरात आजही बऱ्याच ठिकाणी कत्तलखाने चालू आहे. महापालिकेचे अधिकारी उघड्या डोळ्यांनी पाहतात. अनेक भागात उघड्यावर कत्तल होते व विक्री होते. उघड्यावर होणारी हत्या लगेच थांबवावी याची दखल घेण्याचे आदेशित करावे.

**श्री.मो.जावेद कुरैशी :** कत्तलखाने वर्षातून १२-१५ दिवस बंदच असतात. आता कोणत्या दिवशी बंद ठेवणार यापुढे बंद ठेवण्याबाबत निर्णय घेऊ नये. यावर काही लोक आपली रोजी रोटी कमवतात.

**मा.महापौर :** वर्षातून १०-१२ दिवस बंद असतात, कमी प्रमाण आहे. आठवड्यातून एक सुट्टी म्हणून बंद असावयास पाहिजे.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** शासनाकडून आले त्यानुसार प्रस्ताव आला बंद करणार तर कोणते कत्तलखाने बंद ठेवणार, बकरा, जनावरे तसेच कोंबडा यांची कत्तल होते. कोणते बंद ठेवणार.

**श्री.प्रशांत देसरडा :** जे प्राणी मारुन खातात ते सर्व कत्तलखाने यात येतात.

**सौ.लता दलाल :** शिवजयंतीच्या दिवशी सुध्दा कत्तलखाने बंद असावे, अशी सूचना या प्रस्तावात नमूद करावी. दोन्ही शिवजयंतीच्या दिवशी.

**मा.महापौर :** विषय क्र.४ दुरुस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील जैन धर्मीयांचे पर्युषुण पर्व श्रावण वैद्य-१२ व भाद्रपद शुध्द-४ या दोन दिवशी कत्तलखाने व मांस विक्री बंद करण्याचे शासनाचे आदेश आहे. श्रावण वैद्य-१२ या दिवशी गणेश चतुर्थीमुळे कत्तलखाना व मांस विक्री बंद ठेवण्यांत येते. त्याचप्रमाणे भाद्रपद शुध्द-४ या दिवशी व दोन्ही शिवजयंतीच्या दिवशी देखील कत्तलखाने व मांस विक्री बंद ठेवण्यास सर्वानुमते मंजूर देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ अन्वये खालील दर्शविल्याप्रमाणे महिला व बालकल्याण समितीसह मागील सन २००० ते २००५ या कालावधीत कार्यरत असलेल्या विशेष समित्यांचे सन २००५-२०१० या कालावधीसाठी गठण करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

१. महिला व बालकल्याण समिती.

२. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती.
३. शहर सुधार समिती.
४. माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती.
५. गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.
प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**श्री.गजानन बारवाल :** समित्यांना अधिकार द्यावे.
**मा.महापौर :** विषय क्र.५ मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६७ अन्वये खालील दर्शविल्याप्रमाणे महिला व बालकल्याण समिती सह मागील सन २००० ते २००५ या कालावधीत कार्यरत असलेल्या विशेष समित्यांचे सन २००५-२०१० या कालावधीसाठी गठण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. महिला व बालकल्याण समिती.
२. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती.
३. शहर सुधार समिती.
४. माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती.
५. गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.
प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र.१०/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहर हे जागतिक नकाशावर पर्यटनदृष्ट्या महत्वाचे शहर आहे. सध्या शहराची लोकसंख्या दहा लाख एवढी असून, शहर शैक्षणिकदृष्ट्या, औद्योगिकदृष्ट्या विकसीत झालेले असून, शहराचा विस्तार/दिवसेंदिवस वाढत आहे. शहरातील रहदारी वाढती असून, दळणवळणाच्या दृष्टीने शहरातील मुख्य रस्त्याचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. तथापि महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात रस्ते बांधणी/देखभाल दुरुस्ती करिता ठेवलेली तरतूद अपूरी पडत असल्याने, पुणे व ठाणे या महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेने Deferred Payment पध्दतीने शहरातील मुख्य रस्त्यांचे काँक्रीटीकरण केल्यास शहरातील दळणवळण सुरळीत होईल.

**काँक्रीट रत्याचे फायदे खालीलप्रमाणे आहेत.**

१. डांबरी रस्त्यापेक्षा आयुष्य जास्त असते. काँक्रीट रस्त्याचे आयुष्य कमीत कमी ५० वर्षे असते.
२. जास्त वाहतूक लोड ला टिकु शकतात.
३. रस्त्याच्या पृष्ठ भागावरील तुलनात्मकदृष्ट्या गुळगुळीतपणा कमी असल्याने अपघात कमी होतात.

४. ज्या ठिकाणी पाणी साचून राहाते, अशा ठिकाणीही रस्ते खराब होत नाही व अशा ठिकाणी आहे. त्या स्थितीत रस्ते टिकून राहतात.
५. कॉँक्रीट रस्त्याची देखभाल दुरुस्ती खर्च (Life Cycle Cost) डांबरी रस्त्यापेक्षा फारच कमी आहे.
६. वार्षिक देखभाल खर्च अत्यंत कमी असतो.
७. रस्त्यावर खड्डे पडणे, रस्त्याची पातळी खाली जाणे इत्यादी दोष कॉँक्रीट रस्त्यात नसतात.
८. कॉँक्रीट रस्त्याची Surface Reflectivity चांगली असल्याने रात्रीचा प्रवास वाहन चालकासाठी डांबरी रस्त्यापेक्षा सुकर होतो.
९. वाहनातून सांडणाऱ्या तेलाचा परिणाम कॉँक्रीट रस्त्यावर होत नाही.
१०. हवामानातील तापमान बदलाचा परिणाम कॉँक्रीट रत्यावर होत नाही.
११. १४% इंधन बचत.

कॉँक्रीट रस्त्याचे उपरोक्त फायदे पाहता औरंगाबाद शहरात Deferred Payment पध्दतीनुसार औरंगाबाद शहरातील खालील रस्ते विकसीत केल्यास शहराचा चेहरा मोहरा बदलेल.
तरी Defeffred Payment पध्दतीने शहरातील खालील रस्ते कॉँक्रीट रस्ते करता येतील.
१. क्रांतीचौक ते सिटी चौक
२. मिलकॉर्नर ते गुलमंडी
३. सतिष मोटर्स ते औरंगपुरा
४. मोंढानाका व जाफरगेट
५. लक्ष्मणचावडी ते सिल्लेखाना
६. महावीर चौक ते क्रांतीचौक
७. गारखेडा चौक ते एकता चौक
८. बिबीचा मकबरा ते टाऊन हॉल
९. महावीर चौक ते मिलकॉर्नर

तरी उपरोक्त रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण करण्याची कामे (अंदाजे खर्च रुपये ५०.०० कोटी) सन २००५-०६ या अर्थसंकल्पीय वर्षात Deferred Payment पध्दतीने हाती घेण्याकरिता तरतूद उपलब्ध करुन देणे करिता, आंतरराष्ट्रीय पातळीवर सदर कामांच्या निविदा / मागविणे इत्यादी करिता प्रस्ताव मंजूरी करिता सादर.

**सुचक :** श्री.संजय शिरसाट,
श्री.भागवत कराड
**अनुमोदक :** श्री.गजानन बारवाल,
श्री.भगवान घडमोडे,
श्री.रेणुकादास वैद्य,
सौ.लता दलाल.

**<u>संवाद :</u>**

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** आनंदाची बाब आहे. प्रस्ताव आलेला आहे. सिमेंट कॉँक्रीट रस्ते करणार आहोत, ५० कोटी खर्च करणार आहोत. परंतू हे करण्यापुर्वी पाण्यासाठी रक्कम खर्च करावी. २००० पर्यंतची ही पाण्याची लाईनची

योजना होती, नवीन पाईप लाईन सिडको हडकोसाठी कशी टाकता येईल, यासाठी प्रयत्न करावे. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री.प्रशांत देसरडा :** आताच पाणी पुरवठा या विषयावर सभागृहात चर्चा झाली. त्यावर सविस्तर खुलासा प्रशासनाने केलेला आहे. ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्या सदस्याचे मी प्रथम अभिनंदन करतो. किमान ही प्रथा तरी येथे चालू व्हावी म्हणून त्यांना प्रयत्न केले. ५० कोटी खर्च करणार परंतू प्रस्तावात जे रस्ते दिले, त्या सर्वांची अवस्था चांगली आहे, असे माझे मत आहे. या ठरावा ऐवजी ६७ कोटीची जी योजना शासनाकडे पाठविलेली आहे, व त्याचा पाठपुरावाही होत आहे, तीच स्कीम महापालिकेने केली तर ५-७ कोटी रुपये बचत होऊ शकते असा एक ठराव पास केलेला आहे. ६७ कोटी ऐवजी ६० कोटीत ती योजना होऊ शकेल. रस्ते करण्या ऐवजी ६७ कोटी मधील बरेचसे काम झालेले आहे. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत ४० कोटी रुपयाचे पाईप लाईनचे काम होऊ शकेल. हे काम केले तर शासनाकडे सुध्दा पैसा मागणीची गरज पडणार नाही. स्वतंत्र महापालिकेची ही योजना होईल त्यासाठी डिफर पेमेंट सिस्टीम नुसार पाण्याच्या लाईनचा ठराव ठेवावा, जेणेकरुन जनतेला मुबलक पाणी देता येईल. टप्प्या टप्प्याने पैसा आणणार कोठून हा प्रश्न आहे.

**श्री.त्र्यंबक तुपे :** या प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती सभागृहाला देण्यांत यावी. मोंढा नका ते जाफरगेट याचा समावेश केलेला आहे. मोंढा परिसर अशी दुरुस्ती करावी.

**श्री.अजिज जहाँगिरदार :** डिफर पेमेंट वर योजना करणे म्हणजे योजना लांबणीवर टाकणे असा त्याचा अर्थ होतो. उधारीवर काम करुन घेणार, कोणता ठेकेदार मिळणार आहे. औरंगाबाद हे शहर पर्यटकांचे शहर आहे, आणि पर्यटक ज्या मार्गाने येतात, त्या रस्त्याचा यात उल्लेख नाही. रेल्वेस्टेशन कडून, चिकलठाणा कडून पर्यटक येतात त्या रस्त्याचा उल्लेख नाही. ५० कोटी खर्च केल्यानंतर परत करण्याची तरतूद काय आहे. पैसे कोठून आणणार आहेत. जेव्हा ५० कोटी द्यावयाचे झाल्यास त्यावेळी जवळपास १०० कोटी रुपये परत करावे लागणार ही बाब गंभीर असून महापालिकेस परवडणारी नाही. प्रस्ताव रद्द करावा.

**श्री.सलिम खान :** या प्रस्तावात बरेच रस्त्याची कामे झालेली आहे. यातील टाऊन हॉल ते जयसिंगपुरा पर्यंतच्या रस्त्याचे काम झालेले आहे. सतीष मोटार जवळच्या रस्त्याचे काम झालेले आहे ते यातून रद्द करावे.

**श्री.पुरुषोत्तम ठाकूर :** काम करणे जरुरी आहे, प्रस्ताव चांगला असून कॉंक्रीट रस्ते करीत असतांना कामाची प्रत तपासणे आवश्यक आहे. काम चांगले झाले नाही तर सर्वांत खराब रस्ते हे होतील. कॉंक्रीट रस्ते हे आजच्या युगात प्रगतीचे एक प्रतीक आहे. मोठमोठ्या शहरात असे रस्ते झालेले आहे. याबाबतीत सिमेंट उत्पादन करणारी कंपनी व अनेकांशी सल्लामसलत करुन चर्चा करुनच हे करावेत, त्यामुळे माहिती घेतल्यास कमी खर्चात रस्ते होतील. याबाबतीत कन्सल्टन्सी घेतली पाहिजे. सर्व नगरसेवक आज आपल्या वार्डात चांगले काम करण्याची इच्छा प्रगट करीत आहे. एका महिन्याचा अनुभव असा की, येथील लोक चांगले आहे, विचार चांगले, स्वागत चांगल्याप्रकारे होते, परंतू काम करण्याची इच्छा नाही. असे दिसून येते, सोपे काम अवघड होऊन जाते. सर्वात काम अवघड लाईटचे आहे. यापुर्वीही खुप असे प्रस्ताव

नगरसेवकांनी ठेवले होते, अशी माहिती आहे. अधिकाऱ्यांना विनंती की. आपण नगरसेवकांना सहकार्य करावे. प्रेमाने जास्तीत जास्त काम कसे करात येईल, याकडे लक्ष द्यावे.

**मा.महापौर :** आपले म्हणणे थोडक्यात स्पष्ट करावे.

**श्री.गजानन बारवाल :** विषय चांगला आहे, त्यास माझे अनुमोदन आहे. कोणतेही काम हाती घेतांना टप्प्यानुसार होत असते. यात ९ ठिकाणचे काम हाती घ्यावयाचे आहे. अत्यंत चांगले व योग्य दर्जाचे काम करुन घेण्याचा आपला प्रयत्न आहे. आतांच सूचना केल्या की, पाण्यासाठी पैसे कमी पडतात, परंतू रस्त्याचे काँक्रीट करणे. सुध्दा गरजेचे आहेत. ऐतिहासिक शहर आहे. हे रस्ते विकास करीत असतांना आवश्यक जागा भूसंपादन करुन घ्यावी. तरच ही कामे सुरु करावीत.

**श्री.अ.रशीद खॉन (मामू) :** हे काम करण्यास बाहेरचे ठेकेदार येतील. काम करित असतांना पाण्याची, ड्रेनेजची लाईन बाजुला घेऊनच काम करावे. यात जसे महावीर चौक ते मिलकॉर्नर आहे. मिलकॉर्नर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यंत घेण्यांत यावा. तसेच मेडीकल गेट ते ज्युब्लीपार्कपर्यंत घेण्यांत यावे. मेडीकलला ५० वर्षे पूर्ण होत आहे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** ९ रस्त्यात मध्ये विभागीय आयुक्त कार्यालय, सुभेदारी विश्रामगृह ते हर्सुल टी पॉईंट पर्यंत या रस्त्याने पूर्ण पर्यटक जातात. या रस्त्याने मंत्री महोदय तसेच इतर मान्यवर लोक जातात. तसेच हर्सुल टी पॉईट व हडको कॉर्नर चौकाचे सौंदर्यीकरण करण्यांत यावे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** आताच स.सदस्य श्री. जहाँगिरदार यांनी म्हटले की, या कामाची आवश्यकता आहे का? समर्थनगर रस्त्याचे काम १०-१५ दिवसापुर्वीच करण्यांत आले, जे रस्ते यात दर्शविलेले आहे ते सर्व रस्ते नुकतेच डांबरीकरण करण्यात आलेले आहे, यात चंपा मज्जिद ते रोशनगेट रस्त्याचा उल्लेख नाही. ही योजना राबवायची असेल तर सर्वकश चर्चा करुन प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात आला पाहिजे. बजेट प्रोव्हीजन कसे करणार पैसा परत कशा प्रकारे करणार या बाबी प्रस्तावात दर्शविलेल्या नाही. तसेच टेंडर कॉल केल्यानंतर टेंडर येईल की नाही हे सुध्दा प्रशासनाने तपासावे. योजना १५० कोटीच्या बजेटमध्ये ५० कोटी कसे खर्च करणार. शहरातील कोणते रस्ते खराब आहे. कोणते रस्ते करणे गरजेचे आहे. कोणते रस्ते केलेले आहे. जे रस्ते केलेले नाही ते बजेट मध्ये घ्यावे त्यानंतर ही योजना राबवावी.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** हे शहर ऐतिहासिक शहर आहे. मराठवाडयाची राजधानी आहे. पर्यटकांचे शहर आहे. प्रत्येक वर्षी अर्थ संकल्पात रस्त्याची कामे घ्यावी लागतात. रस्ते व्यवस्थित नसतील तर निश्चितच त्याचा दळण वळणावर, पर्यटकांवर परिणाम होतो. आताच काही स.सदस्यांनी मत व्यक्त केले, आर्थिक तरतूद काय? शासकीय प्रस्ताव असावा. जेवढे बजेट असते तेवढेच प्रस्ताव प्रशासन देत असते हा अशासकीय प्रस्ताव यासाठीच आहे की, डिफर पेमेंटवर हे काम होणार आहे. निविदा काढतांना त्या खुल्या असणार आहे. त्या बाबतीत नियम व अटी नियमाने राहतील. पारदर्शकतेने हे काम होणार आहे. विकासाचा दृष्टीकोन समोर ठेवून निश्चितपणे पुणे, मुंबई, ठाणे महानगरपालिका धरतीवर या शहरातील असे रस्ते व्हावे. या शहराचा

विकास व्हावा, या दृष्टीने प्रस्ताव ठेवलेला आहे. चांगल्या प्रस्तावास कुठेतरी गालबोट लावून वेगळी दिशा द्यायची हे काम आता थांबले पाहिजे. यात काही रस्ते घेण्याचे राहीले असतील यास मी सहमत आहे. या शहराचा विकास सार्वजनिक मत लक्षात घेऊन झाला पाहिजे. या मताचे आम्ही आहोत. औद्योगिक, पर्यटन तसेच दळणवळणाच्या दृष्टीकोनातून हे शहर वाढले पाहिजे, हा दृष्टीकोन समोर ठेवला पाहिजे पुण्यामध्ये डिफर पेमेंटवर अनेक भागात रस्ते झालेले आहे. तसेच नागपूर, ठाणे या ठिकाणीही झालेले आहे. त्या धर्तीवर हे काम करायचे आहे. याची मला जाणीव आहे. एक विकासाचे पाऊल आपण उचलत असून विकासाला गती देण्याचे काम या सभागृहाचे देखील आहे. या सभागृहात चांगले व अभ्यासू स.सदस्य आहेत. शहराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून या ठरावास मंजूरी देण्यात यावी. जे रस्ते राहून गेले असतील, त्यांचा समावेश यात करावा. चंपा मस्जिद ते सिडको पर्यंतचा संपूर्ण रस्ता घ्यावा काही अडचण नाही, कारण येणारे पर्यटक काही एकाच भागात फिरत नाही. संपूर्ण शहरात फिरतात फक्त ठराविकच रस्ते न ठेवता १३८ चौ.किलो मीटर मध्ये हे शहर बसलेले आहे. विधायक दृष्टीकोन समोर ठेऊन या प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी. याबाबत कार्यकारी अभियंता (रस्ते) यांनी सुध्दा अभ्यास करुन यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे, तसेच या सभागृहाने पाणी पुरवठ्याच्या बाबतीत काही सुचना केलेल्या आहेत, त्या योग्य आहेत. त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव ठेवून पुढच्या सर्वसाधारण सभेत ६७ कोटीची जी योजना जीवन प्राधिकरणा मार्फत राबविण्यांत येत आहे. ती महानगरपालिकेने राबवावी तसा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे घेऊन जावा. विरोधी पक्षाचे सदस्यही बरोबर राहतील. सरकार त्यांचे आहे. आता ४ वर्ष निवडणूका नाही. विकास करण्याच्या दृष्टीने सर्वानी पावले उचलावी व हा प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री.भगवान घडमोडे** : शहरात कॉंक्रीट रस्ते करावयाचे यावर चर्चा चालू आहे. शहराचा विकास करायचा म्हटले की, सर्वानी मिळून निर्णय घ्यावाच लागतो. असा निर्णय सर्वानी मिळून घेतल्यास ते काम चांगल्याप्रकारे होते. रक्कम कितीही असो, परंतू हे रस्ते या पध्दतीने करण्याचा निर्णय प्रथम घ्यावा लागणार आहे. स.सदस्यांच्या सुचना विचारात घेतल्या जातील. याबद्दल दुमत नाही. टेंडर कसे काढणार, एजन्सी कोणती येणार तसा प्रस्ताव पुन्हा सभागृहासमोर येणारच आहे. सर्वांना माहिती आहे, दरवर्षी डांबरीकरण करावे लागतात. पाणी साचल्यानंतर १ वर्षात पुन्हा रस्ते खराब होतात. व देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली किती तरी रक्कम खर्च होते. हा प्रस्ताव मंजूर केल्यास पुन्हा पुन्हा रस्ते दुरुस्त करण्याची गरज पडणार नाही. ५० वर्ष रस्ते राहतील. सुतगिरणीचा रस्ता अनेक वेळा दुरुस्त केला, अनेकवेळा खर्च झालेला आहे. स.सदस्य श्री.संजय जोशी यांचा नेहमीचा तो प्रश्नच राहत होता. या ठिकाणी पर्यटक ज्या रस्त्याने येतात ते रस्ते घेतले नाही. असे स.सदस्य श्री.जहॉंगिरदार यांनी म्हटले परंतू चिकलठाणा हा रस्ता बी अँड सी तसेच खुलताबाद हा रस्ता सुध्दा बी अँड सी च्या हद्दीत आहे. त्यामुळे ते रस्ते यात घेता येणार नाही. महापालिका हद्दीत जे रस्ते येतात ते समावेश करु शकतो. यात प्रशासन टेक्नीकल बाबी तपासतील व शहर विकासासाठी चांगले पाऊल उचलेले आहे. असे रस्ते इतर महापालिकेत

सुध्दा झालेले आहे. जेथे दळणवळण असेल तेथे त्या शहराचा विकास सुध्दा चांगला होता. यामुळे खर्चात सुध्दा बचत होणार आहे. पाण्याच्या पाईप लाईनचा मुद्दा स.सदस्यांनी मांडला परंतू मागील सर्वसाधारण सभेत ठराव घेतला की, एक्स्प्रेस लाईनचे काम हे ६७ कोटी ऐवजी ४० कोटीत होऊ शकते. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. जीवन प्राधिकरणास द्यावा लागणारा खर्च बचत राहील, तो पैसा बचत राहणेसाठी महापालिकेने प्रयत्न करावेत म्हणून त्या प्रस्तावा करिता शासनाकडे सर्व पदाधिकारी स.सदस्य यांनी एकत्र सोबत जाऊन जी ६७ कोटीची योजना आहे. ती ४० कोटीत पूर्ण कशी होईल यासाठी प्रयत्न करुन तसा ठराव घेतलेला आहे, हा प्रस्ताव मंजूर करावा.

**डॉ.आशा बिनवडे :** प्रस्ताव खरोखरच अभिनंदनीय आहे. ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्या सदस्याचे मी मनपूर्वक अभिनंदन करते. या शहरास पर्यटन शहर म्हणून जागतिक स्तरावर खूप महत्व आहे. जास्त दळणवळण असणारे रस्ते हे कॉंक्रीटचे व्हावेत याबद्दल दुमत नाही. परंतू पर्यटकांना आकर्षित करायचे असेल व शहराचा विकास करायचा असेल तर नुसते रस्ते करुन चालणार नाही. त्याच बरोबर शहरासाठी लागणारे पाणी हे तितकेच महत्वाचे आहे. काही स.सदस्यांनी मत व्यक्त केले की, पाणी पुरवठ्यासाठी प्राधान्याने अगोदर विचार करावयास पाहिजे. परतफेड कशी करणार हा भाग नंतरचा आहे. या प्रस्तावास मंजूरी द्यायची की नाही हे निश्चित करणे आहे. रस्ते करण्याचाच प्रस्ताव न घेता त्याच बरोबर पाणी पुरवठ्याचा सुध्दा प्रस्ताव ६७ कोटीच्या बाबतीत डिफर पेमेंटवर करणे बाबत का विचार करु नये. दोन्ही प्रस्ताव घ्यावे. रस्ते करण्याची सूची यात नमूद आहे. यात म्हटले आहे अधिक रहदारीचे रस्ते यात सेव्हन हील ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंतचा रस्त्याचा समावेश घ्यावा. तसेच आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक हा अत्यंत रहदारीचा रस्ता आहे, या रस्त्यावरुन रहदारी वाढलेली आहे. या रस्त्याचाही प्राधान्याने विचार करावा. पाण्यासाठी सुध्दा डिफर पेमेंटवर विचार करावा, अशी विनंती आहे.

**श्री.वसंत नरवडे :** शहराचा विकास करण्याकरिता सर्वच स.सदस्य सहकार्य करतील यात शंका नाही. या प्रस्तावात ज्या रस्त्याची नांवे नमूद केली, प्रत्येक स.सदस्य अमुक रस्ता घ्यावा म्हणून नमूद करतील. जे रस्ते पर्यटकांच्या दृष्टीने यात घेतले नाही ते घेण्यात यावे. व यासाठी पैसा केव्हा व कधी व कोणत्या वर्षात उपलब्ध होणार याचा खुलासा घ्यावा. डी.पी.प्लॅनप्रमाणे रोडचे काम पूर्ण झालेले आहेत का? अशा रस्त्यात बाधीत असलेले मिळकत संपादन करावी. हे कामपूर्ण करणार आहात का? त्यानंतर यावर विचार करावा. विचार करण्यासारखा ठराव आहे. दुमत नाही परंतू पाण्याची, ड्रेनेजची लाईन एकाच ठिकाणाहून वाहत असतांना कॉंक्रीट रस्ते केल्यानंतर पुन्हा देखभाल दुरुस्तीसाठी खर्च होऊ नये. याची दखल घेतली पाहिजे. प्रशासनाने याबाबीची दखल घेतली पाहिजे. प्रशासनाने यात खोलवर जाऊन या रस्त्यावरील जी कामे आहे, डी.पी.रोड आहे. त्यास बाधीत ज्या मालमत्ता आहे, त्या विषयी पूर्ण चौकशी करुन या कामास व बजेट उपलब्ध आहे ते दाखवून त्यानंतर हे काम करण्यास हरकत नाही. त्यास आमचे सहकार्य आहे. सर्व बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात व यावर विचार व्हावा.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** या सभागृहात नागपूर, ठाणे महापालिकेचे उदाहरण दिले, त्या महानगरपालिकेचे बजेट जास्त आहे. अगोदर पूर्ण माहिती घ्यावी, बजेटमध्ये घेतल्यास पैसे द्यावेच लागतील. परंतू पैसा उपलब्ध कसा करणार याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :** हा प्रस्ताव स.सदस्यांनी ठेवला आहे. या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी खर्च किती येणार हा प्रश्न नंतरचा आहे. डिफर पेमेंटवर रस्ते, सिमेंट कॉँक्रीटचे करायचे की नाही हा मुद्दा आहे. प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर कोणते रस्ते घ्यायचे, कोणते घ्यायचे नाहीत यावर प्रशासन निर्णय घेईल.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** कोणती चर्चा झालेली नाही. प्रशासकीय प्रस्ताव येणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** हा प्रस्ताव स.सदस्यांनी ठेवलेला आहे. प्रशासन तपासणी करुन पुन्हा प्रस्ताव ठेवेल, त्यानंतर निर्णय घेता येईल.

**श्री.अजिज जहॉँगिरदार :** पुढील बैठकीत हा प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

**श्री.संजय शिरसाट :** गेले ५ वर्ष मी सभागृहाचा सदस्य होतो, प्रस्ताव आणण्याचे कारणे वेगळी आहेत. चांगले काम करायचे झाल्यास ते होऊ नये यासाठी चर्चा कशी करायची हे काही सदस्यांना माहित आहे. निवडणूकीच्या वेळी प्रत्येक पक्षाचे लोक या शहराला सुंदर शहर करणार अशी घोषणा करतात. कॉँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले हे शहर टॉपटेन मध्ये दिसावे, हे शहर चांगले दिसावे हा सर्वच पक्षाच्या नेत्यांना दृष्टीकोन असतो. प्रस्ताव येतो, तेव्हा कोणी आणला याचा विचार करु नये. प्रस्ताव काय आहे, समजून घ्यावे. रस्ते ५० कोटीत होतील हे मला माहिती नाही. मी स्वतः पुणे, ठाणे महापालिकेत पाहणी केली. रस्ते सुंदर दिसतात कोणत्या माध्यमातून केले, त्याची माहिती त्यांनी दिल्यानंतर हा प्रस्ताव ठेवलेला आहे. डिफर्ड पेमेंट सिस्टीम काय असते, हे अगोदर जाणून घेणे महत्वाचे आहे. यात ९ रस्ते घेतले आहेत यातून काही रस्ते समावेश होऊ शकतात. काही रस्ते वगळू शकतात. ते घेता येणार नाही. असे सुध्दा होऊ शकते. निविदा काढल्यानंतर इंटरनॅशनल पातळीवरील निविदाधारक येतात निविदा भरतात ज्याचे ५० कोटीच्या वरचे जे लायसन्स धारक असतात ते निविदा घेतात. हे रस्ते करण्यासाठी एकूण १५ महिन्याचा वेळ देणार आहोत. एकाचवेळी रस्त्याचे काम सुरु होईल. जे रस्ते दिले यात माझ्या वार्डाचा एकही रस्ता नाही. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशनचा एक रस्ता यात नाही कारण हा प्रश्न संपूर्ण शहरासाठीचा आहे. डिफडे पेमेंट सिस्टीमनुसार १० वर्षात स्लॅब पाडण्याचे काम प्रशासनाने आहे. ते प्रशासनाकडे सोपवू. गेल्यावर्षी १९ कोटी रुपये रस्त्यावर खर्च केले. महापालिकेची निवडणूक झाली सर्व रस्त्याविषयी बातम्या वृत्तपत्रात आल्या स्थायी समितीचा सदस्य असल्यामुळे ऐनवेळी २.२५ कोटीचे रस्ते पुन्हा घेतले गेले होते. या शहरात जे रस्ते झ ाले, त्यावर फक्त २० एम.एम. डांबरीकरण करण्यांत येते. या पावसाळ्यात ते रस्ते खराब होतात, पुन्हा बजेट प्रोव्हीजनच्या वेळेस प्रत्येक सदस्य अमुक रस्ता करावा, म्हणून मागणी करतात. डांबरीकरण करावे, हाच फक्त सदस्यांचा हेतू असतो. डांबरीकरण होते, दुसऱ्या वर्षीच ते रस्ते उखडतात, हे रस्ते ५० वर्षापर्यंत टिकतात. हे जेव्हा काम होईल, तेव्हा ड्रेनेज लाईन पाण्याच्या लाईनच्या बाजुला घेतले जातील. आजही प्रत्येक वार्डातून तक्रारी

येतात, ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाईप लाईन मध्ये येते. याचे कारण जी सिस्टीम चालू आहे ती ५० वर्षापुर्वी जे आराखडे तयार केले होते, त्यानुसार चालू आहे. आजही ड्रेनेजच्या मुख्य वाहिन्या किती याचे रेकॉर्ड नाही. प्रशासनास हा प्रस्ताव सादर करण्याचे सुचविले होते, परंतू हे काम करायचे की नाही यास प्रथमतः सर्वसाधारण सभेने मान्यता द्यावयास पाहिजे असे प्रशासनाने सांगितले. बीओटी पध्दतीने रेल्वेस्टेशन, वसंतभुवन, औरंगपुरा मंजूरी झालेली आहे. परंतू अद्याप कार्यवाही सुरु केली नाही. म्हणून या सभेत मी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. फक्त १५ महिनेच वाट बघायची पुणे, मुंबई महापालिकामध्ये ज्या पध्दतीने कामे झाली, करार झाला, त्या धरतीवर हे करणार आहोत प्रशासन माहिती घेतील, ॲग्रीमेंट कसे आहे, ते या सभागृहात येईल, त्यावर काही सूचना सभागृहाच्या असतील त्यानुसार कार्यवाही करता येईल. एकदा रस्ता केल्यानंतर त्यास खोदता येणार नाही. १० वर्षाचे देखभाल दुरुस्तीचे काम त्या ठेकेदाराकडे राहील. महापालिकेचा एक पैसा त्यावर खर्च होणार नाही. दरवर्षी डांबरीकरण पॅचवर्क च्या नावाखाली १.५० ते २.०० कोटी रुपये खर्च करावे लागतात. गुलमंडी भागात केव्हा तरी कॉंक्रीट रस्ता झालेला आहे. आजही चांगला आहे, हा पहिला प्रयोग आहे. मला जे सूचले ते रस्ते यात नमूद केले. सभागृह जे सुचविल, ते रस्ते आणखी नमूद करावेत. परंतू चांगल्या कामास विरोध करु नये. एकदा रस्ता झाला तर ५० वर्ष डांबरीकरण करण्याची गरज पडणार नाही. डिफर्ड पेमेंट सिस्टीमवर संबंधित ठेकेदाराला दरवर्षी ५-६ कोटी देणार आहोत. ५० कोटी एकदम महापालिकेकडे नाही. एक प्रयोग करणे आवश्यक आहे. नुकतीच नव्याने अस्तित्वात आलेली अकोला महानगरपालिका १६ कोटीचे डिफर्ड पेमेंटवर रस्ते करीत असेल तर ही महापालिका जुनी आहे व जुने नगरसेवक या सभागृहात आहे. त्यांना सर्व माहिती आहे. या शहरामध्ये प्रत्येक नागरिकास त्रास होतो. नागरिकांचे हित लक्षात घेत असाल तर विनंती की, १५ महिन्याच्या मुदतीत हे सर्व रस्ते एकाचवेळी तयार करायचे आहे. एक-एक रस्ता होईल असे नाही सर्वच रस्ते बरोबर होतील. नागरिकांना एक वर्षभर त्रास होईल, परंतू या शहराचे संपूर्ण रस्ते चांगले होत आहे. याची जाणीव जनतेमध्ये येईल. ही स्कीम आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही सूचना असतील त्या मा.आयुक्त, मा.महापौरांना कळवाव्यात त्याची दखल घेतली जाईल. या प्रस्तावास विरोध करीत असाल तर पुन्हा १७ कोटीचे रस्ते यावर्षी करावे लागणार आहे. हा प्रस्ताव चांगला आहे त्यास मान्यता द्यावी.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** विरोध नाही पैसा कोठून आणणार आहे. या सभागृहाचे जेष्ठ सदस्य, मा.महापौर एकत्र बसून चर्चा करावी निर्णय घेतला जाईल. सर्वांना सोबत घेवून चालावे.

**श्री.संजय शिरसाट :** या प्रस्तावात स.अ.रशिद मामू, मनमोहनसिंग ओबेरॉय व इतर काही सदस्यांचा सुचक व अनुमोदक म्हणून समावेश करावा.

**श्री.वसंत नरवडे :** हा आंतरराष्ट्रीय ठेकेदाराचा कॉन्ट्रक्ट आहे. सभासदांना शंका आली असेल. ४०% बिलो मध्ये काम करणारे ठेकेदार या महापालिकेत आहे. सदस्यांनी संपूर्ण ठराव वाचला नसेल. आंतरराष्ट्रीय ठेकेदाराकडून निविदा मागवतात व महापालिकेचे ठेकेदार काम करतात, याबाबत खुलासा करावा.

**श्री.शशांक विसपुते :** सेव्हन हील ते गजानन महाराज मंदिर मार्गे जाणारा रेल्वे क्रॉसिंग शिवाजी नगर या रस्त्याचा समावेश करावा.

**श्री.तरविंद्रसिंग धिल्लन :** या प्रस्तावास सम्मती आहे. सिमेंट कॉंक्रीटचे रोड करण्याचा प्रस्ताव ठेवला, यात रोषणगेट ते आझाद चौक तसेच रेल्वेस्टेशन ते महाविर चौक, महापालिका ते आझाद चौक, मिलकॉर्नर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पानचक्की ते मेडीकल कॉलेज ते ज्युब्लीपार्क पर्यंतचा रस्ता घ्यावा.

**मा.महापौर :** दुरुस्तीसह मंजूर करण्यांत येत आहे. प्रशासनाने तांत्रिक बाजु तपासून सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुणे व ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेने Deferred Payment पध्दतीने शहरातील प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ९ या मुख्य रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यांस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे यात रोषणगेट ते आझाद चौक तसेच रेल्वेस्टेशन ते महाविर चौक, महापालिका ते आझाद चौक, मिलकॉर्नर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पानचक्की ते मेडीकल कॉलेज ते ज्युब्लीपार्क पर्यंतचा रस्ता सेव्हनहिल ते रेल्वे क्रॉसिंग शिवाजीनगर, आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक, सुभेदारी विश्रामगृह ते हर्सुल टी पॉंईट, जाफरगेट मोंढा परिसर ई.रस्त्यांचा समावेश करणेस तसेच प्रशासनाने तांत्रिक बाजू तपासून सविस्तर प्रस्ताव ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विभागीय क्रिडा संकुल समिती व औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन तर्फे पद्मविभुषण कै.गोविंदभाईजी श्रॉफ यांचे स्मृतिप्रित्यर्थ राष्ट्रीय स्तरावर खो-खो स्पर्धेचे आयोजन दि.२५ ते २९ मे २००५ या कालावधीत आयोजित करण्यांत आली आहे. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रक्कम रु.३.०० लक्ष आर्थिक मदत अपेक्षिलेली आहे. तरी योग्य ती आर्थिक मदत देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भगवान घडमोडे
**अनुमोदक :** श्री.संजय शिरसाट

**संवाद :**

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** विभागीय क्रिडा संकुल समिती व औरंगाबाद जिल्हा खो-खो असोशियशन तर्फे पद्मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचे स्मृती प्रित्यर्थ खो-खो स्पर्धेसाठी ३ लक्षची मागणी केलेली आहे. यापुढे अनेक संस्था मागणी करतील त्यांना अशीच मदत देणार का? हा प्रस्ताव मंजूर करुन नये.

**श्री.संजय जगताप :** कै.गोविदभाई श्रॉफ यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी त्रास सहन केलेला आहे. २-३ लक्ष रुपये खर्च करण्यास हरकत नसावी.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** यापुर्वीही दिलेले आहे. नियमावली नंतर करावी. किती रक्कम द्यायची ते ठरवावे, प्रस्ताव मंजूर करावा. १ लक्ष रु. द्यावे.

**श्री.संजय शिरसाट :** विभागीय क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष विभागीय आयुक्त हे आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून मा.महापौर आहे. इतर दुसरी समिती किंवा संस्था नाही. म्हणून एक लक्ष देण्यांत यावे.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** विरोधी पक्ष नेता इतर सदस्याचे नांव सूचक, अनुमोदक म्हणून घेण्यात यावे. १ लक्ष देण्यात यावे ही विनंती.

**श्री.संजय शिरसाट :** श्री.अ.रशिद खॉन (मामू) यांचे सुचक म्हणून किंवा अनुमोदक म्हणून नांव टाकण्यांत यावे.

**श्री.अजिज जहॉंगिरदार :** असे आणखी ठराव येण्याची शक्यता आहे. रेल्वेस्टेशन येथे फुटबॉल क्रिडा स्पर्धा होते, आझाद मैदानावर अमानउल्ला मोतीवाला फुटबॉल क्रिडा स्पर्धा होते, उस्मानपुरा येथे गुरु गोविंदसिंग महाराज महाराज फुटबॉल क्रिडा स्पर्धा होते. अनेक ठिकाणी स्पर्धा होतात त्या सर्वांना अशी मदत करणार का? हे ठराव महापालिकेच्या हिताचे आहे का? महापालिकेची तशी परिस्थिती आहेत का? प्रस्ताव आल्यानंतर सर्वांनाच मदत करावी लागणार आहे. त्यासाठी या प्रस्तावावर विचार करावा.

**श्री.खान सलीम :** संस्था त्यांची आहे. आपण का द्यावे.

**श्री.वसंत नरवडे :** शहरातील जनतेच्या दृष्टीने आरोग्य व स्वच्छतेचे काम महापालिका करते. त्याप्रमाणेच खेळाडूंना प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने ही स्पर्धा होत आहे. असोसिएशनने घेतलेली ही भुमिका आहे. मा.कृष्णा भागे हे विभागीय आयुक्त हे या समितीचे काम करतात. या शहरात आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खो-खो स्पर्धक येतात. या प्रस्तावास मंजूरी द्यावी.

**श्री.गजानन बारवाल :** एक लक्ष रुपये मंजूर करावे.

**मा.महापौर :** एक लक्ष रुपये देण्यास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीय क्रिडा संकुल समिती व औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिऐशन तर्फे पदमविभुषण कै.गोविंदभाईजी श्रॉफ यांचे स्मृतिप्रित्यर्थ आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील खो-खो स्पर्धेसाठी रु.१ लक्षची आर्थिक मदत देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विद्युत मंडळाच्या भार नियमनामुळे (लोड शेडींग) शहराच्या पाणी पुरवठ्यावर विपरीत परिणाम होत आहे. काही ठिकाणी तर चार चार दिवस पाणी पुरवठा होऊ शकत नाही. म.न.पा.च्या एका जलकुंभातून दुसऱ्या जलकुंभात पंपीगद्वारे पाणी सोडले जाते. भार नियमानाची वेळ विविध क्षेत्रात विभागून देण्यांत आल्यामुळे प्रत्येक जलकुंभावर विज पुरवठा एकाचवेळी चालु राहील याची शाश्वती नाही. ज्यामुळे जलकुंभामध्ये पुरेसा पाणीसाठा होत नाही. परिणामी काही भागात कमी दाबाने तर काही ठिकाणी पाण्याचा थेंब देखील येत नाही. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांचे पाण्या वाचून हाल होत आहे.

पाणी पुरवठा सुरळीत व्हावा, नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी पुरवठा व्हावा या करिता मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या जलकुंभाना भार नियमनातून वगळण्यांत यावे. आवश्यक वाटल्यास यासंबंधी शासनास प्रस्ताव पाठविण्यांत यावा. तसेच या कामाकरिता

लागणारा आवश्यक खर्च मनपाने करावा, जेणेकरुन नागरिकांचे पाण्यामुळे होणारे हाल थांबतील. करिता लागणाऱ्या खर्चास मान्यता देण्यासाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.खान मुजीब मिर आलम खान
**अनुमोदक :** श्री.खान निसार मोहमंद खान

<u>संवाद :</u>

**मा.महापौर :** याबाबत आताच चर्चा झालेली आहे. भारनियमनाबाबत १.०८ प्रस्ताव ठेवणार आहेत सुचक उपस्थित नाही.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** अनुमोदक उपस्थित आहे. पाणी प्रश्नाबाबत जेव्हा बैठक होईल तेव्हा हा विषय घेण्यांत यावा.

**मा.महापौर :** पाणी प्रश्नावर बैठक होईल, त्यावेळी हा विषय घेण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव पाणी प्रश्नावर बैठक होईल, त्यावेळी हा विषय घेण्यांत येईल, असे ठरले.

**विषय क्र.१३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.६ बेगमपुरा येथील रहिवाशांनी मागणी केली आहे की, बेगमपुरा ऐवजी गोगानाथ नगर असे नामकरण करण्यांत यावे, करिता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.विनायक प्रभाकर पांडे
**अनुमोदक :** श्री.संजय शिरसाट.

<u>संवाद :</u>

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** नामांतर कमेटी समोर हा विषय ठेवण्यांत यावा.

**श्री.गजानन बारवाल :** ठराव मंजूर करावा, यानंतर नामांतर कमेटी नियुक्त करावी.

**श्री.विनायक पांडे :** हा प्रस्ताव तेथील गोगाबाबा अस्मीते नुसार टाकण्यात आलेला आहे. गोगाबाबा यांना गेल्या ७०० वर्षापासून सर्व समाज मानतो. जेथे गोगा बाबाचे जन्म स्थान आहे, तेथे त्या गोदामरीला आज सुध्दा मुस्लीम पुजारी आहे. तर कोणता प्रश्न उपस्थित न करता हा प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री.खान सलीम :** गोगाबाबा नांव देण्याची गरज नाही. बेगमपुरा हे ऐतिहासिक नांव आहे. आम्ही तुम्ही जन्म होण्याच्या अगोदर पासून नावं आहे. बीबीका मकबरा जवळ आहे. बेगमपुरा या नावाने ओळखले जाते. अ.रशिद मामु यांनी कमेटी नियुक्त करण्याची सूचना केली त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री.अ.रशिद खॉन (मामू) :** राजाबाजार जुने नांव आहे. कोणी म्हणेल नांव बदलावे यासाठी एक कमेटी नियुक्त करावी त्या कमेटी समोर हा प्रस्ताव ठेवावा.

**मा.महापौर :** कमेटी स्थापन करुन कमेटीपुढे पाठविण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव कमेटी स्थापन करुन कमेटीपुढे पाठविण्यांस मान्यता देण्यांत आली.

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा सपंल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९.०५.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

श्री.मुजीब आलम शाह, नगरसेवक

**प्रश्न क्र.०१ :**

१. दिनांक ०१.०४.२००३ ते ३१.०३.२००५ पर्यंत मनपा कार्यालयात वर्ग-४ मध्ये एकूण किती कर्मचाऱ्यांना अनुकंपा धर्तीवर नियुक्ती दिली आहे. त्याची सविस्तर माहिती यादीसह पुरविण्यांत यावे.

२. अनुकंपा धर्तीवर घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कोणकोणत्या नातेवाईकांच्या जागेवर नियुक्त करण्यात आलेले आहे. याबाबत यादीसह सविस्तर माहिती पुरविण्यांत यावी.

सहाय्यक आयुक्त-२

**उत्तर :**

सदरील प्रश्नाची माहिती पुढील सर्वसाधारण सभेत देण्यांत येईल, असे कळविले आहे.

सौ.खान मेहेरुन्नीसा हमीद खान, नगरसेविका

**प्रश्न क्र.०२**

१. रविंद्रनगर टी पॉईंट ते कटकट गेट पर्यंतच्या ५० फुट रस्त्यावर कोणकोणती मालमत्ता बाधीत झाली? (सि.स.नं.व नांव) भूसंपादनाची कार्यवाही झाली का? सर्वच बाधीत होणाऱ्या मालमत्ता धारकांना मोबदला देण्यात आला का? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

२. चंपा मस्जिद ते पिरगैब दर्गापर्यंतच्या १०० फुटी रस्त्यावरील बाधित झालेल्या मालमत्ता संबंधित मालमत्ता धारकांना मोबदला देण्यात आला का? (सि.स.नं.) आणि नावासहीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

३. त्रिवेणीनगर आणि म.न.पा.प्रा.शा. क्र.३ च्या परिसरात म.न.पा.ने संपादित केलेली जमिनी किती व कोणती? (सि.स.नं.व मालमत्ता धारकांचे नांव) ही जमीन कोणत्या उद्देशासाठी संपादित करण्यात आली होती. त्रिवेणीनगरसाठी अलॉट करण्यात आलेली जागा किती? (रेखाकंनानुसार एकूण प्लॉटस आणि खुली जागा याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.)

४. म.न.पा.प्रा.शा. किराडपुरा नं.३ च्या पाठीमागे व उत्तरेकडे असलेले म.न.पा.ने अलॉट केलेले भूखंड किती? (अलॉट केलेल्याचे नांव व क्षेत्र) येथील काही भूखंडावर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम करण्यात आले हे खरे आहे का? असल्यास अतिक्रमण करणारे कोण? अतिक्रमण करणाऱ्यांवर कार्यवाही करणार काय? सविस्तर माहिती सर्वसाधारण सभेत देण्यांत यावी.

५. पंचायत समिती कार्यालय ते सलीम अली सरोवरापर्यंत व्ही.आय.पी.रोड साठी संपादित करण्यात आलेली जागा किती? (सि.स.नं.आणि मालमत्ता धारकाचे नांव)

देण्यात आलेल्या आलेल्या मोबदल्याची रक्कम किती? संपादन केलेले परंतू मोबदला न देण्यात आलेले भूखंड (सि.स.नं.) कोणते?
सविस्तर महिती देण्यांत यावी.

सहाय्यक संचालक, नगर रचना :

**उत्तर :**

सदरील प्रश्नाची माहिती पुढील सर्वसाधारण सभेत देण्यांत येईल, असे कळविले आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |